// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वर्ष : १ अंक : ७

# साद

## दे, साथ घे

सप्टेंबर २०१९




# सुवर्ण सिंधू

## महिला बचतगटांना शून्य टक्के दराने कर्ज

## सांगता 'प्रज्वला' यात्रेची



महाराष्ट्र राज्य महिला आयोग

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

अध्यक्षा



**विजया रहाटकर**

## स्वागत नूतन सदस्यांचे...



**चंद्रिका चौहान**

**सोलापूर**

उद्योगवर्धिनीच्या माध्यमातून दोन दशकांहून अधिक काळ महिला बचत गटांसाठी कार्यरत. अनेक पुरस्कारांनी सन्मानित



**अनुसया गुप्ता**

**नागपूर**

नागपूर शहरातील महिला दक्षता समिती, लोकपंचायत समितीमध्ये सदस्य म्हणून कार्यरत.



**ज्योती हरिशचंद्र भोये**

**जव्हार (जि.पालघर)**

जव्हार पंचायत समितीच्या माजी सभापती. आदिवासी भागातील महिलांच्या विकासासाठी कार्यरत



**रोहिणी नायडू**

**नाशिक**

विविध सामाजिक संस्थांमधे सक्रिय सहभाग. तसेच सिव्हील हॉस्पिटल नाशिकच्या प्रशासन समिती सदस्य आणि महानगरपालिका पीसीपीएनडीटी समिती सदस्य



**रिदा रशीद**

**मुंबई**

अल्पसंख्याक महिलांच्या उन्नतीसाठी कार्यरत. अल्पसंख्यांक बचतगट आणि कायदेशीर जनजागृतीसाठी विशेष प्रयत्न.



**गयाताई शिवाजीराव कराड**

**परळी (जि.बीड)**

महिला आयोगाच्या सदस्यपदी फेरनियुक्ती, मराठवाड्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //
साद
दे, साथ घे
RNI No. MAHMAR49593

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
फोन : ०२२-२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई-१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन**
**७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य : ₹ १०**
**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**

# संपादकीय



## आशा उज्ज्वल भविष्याची

औरंगाबादला नुकताच पंतप्रधानांच्या उपस्थित महिला बचत गटांचा मेळावा झाला. अनेक अर्थांनी हा मेळावा महत्त्वाचा होता. ज्या महिलांसाठी कदाचित स्थानिक नगरसेवक किंवा ग्रामपंचायतींचे अधिकारी, पदाधिकारी यांचीही भेट अवघड असते, त्यांना थेट पंतप्रधानांचे भाषण ऐकण्याची संधी मिळाली. पंतप्रधानांनी या मेळाव्यात मांडलेली भूमिकाही महत्त्वाची होती. महिला नेतृत्वातून देशाचे कल्याण करण्याची भूमिका पंतप्रधानांनी मांडले. देशातील महिला श्रमशक्ती वाढते आहे. महिला साक्षर, सुशिक्षित कधीच झाल्या आहेत, त्याही पलीकडे जाऊन आता त्या सक्षम होत असताना देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाकडून त्यांच्या या प्रयत्नांची दखल घेतली जाणे आणि केवळ दखल घेणे इतकेच न राहाता त्यांच्या हाती नेतृत्व सोपविण्याची तयारी दाखविली जाणे, ही बाब नक्कीच उल्लेखनीय आणि प्रशंसनीय आहे.

पंतप्रधानांनी आपल्या भाषणात महिलांसाठी राबविण्यात येत असलेल्या उज्ज्वला, जन धन, मुद्रा आदी योजनांची माहिती दिली. उज्ज्वला योजनेने आता आठ कोटींचा टप्पा गाठला आहे. देशातील प्रत्येक घरात गॅस सिलिंडर पोहोचविणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. घरे धूरमुक्त झाल्यास त्या घरातील महिलेचे आयुष्य काही वर्षांनी नक्कीच वाढल्याशिवाय राहणार नाही. ही बाब आपण लक्षात घेतली पाहिजे. या धूरमुक्तीमुळे श्वसन, डोळे यांच्या आजारांपासून महिलांना मुक्ती मिळेल. आपला देश कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेवर चालतो. स्वातंत्र्यप्राप्तीपासून याच संकल्पनेच्या आधारे आपण वाटचाल करीत आहोत. पंतप्रधानांनी याच वाटेवरील पुढील दिशा आपल्या भाषणात दाखवली. जलजीवन योजना हे भारतीय महिलांच्या आयुष्यातील पुढील क्रांतिकारी पाऊल ठरणार आहे. दिवंगत समाजवादी नेते राममनोहर लोहिया यांचे विधान पंतप्रधानांनी उद्धृत केले. शौचालयासाठी बाहेर जाणे आणि पिण्याचे पाणी आणण्यासाठी श्रम वाया घालवणे यातून आपण महिलांना मुक्त करू शकलो, तरच खऱ्या अर्थाने आपण त्यांना उत्पादक कार्यांमध्ये सहभागी करून घेऊ शकू. घराघरांत विशेषतः ग्रामीण भागातील वंचित घरांमध्ये नळाद्वारे पिण्याचे पाणी पोहोचविण्यासाठी जलजीवन योजना आखण्यात आली असून, त्यावर सुमारे तीन लाख कोटी रुपये खर्च करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. आणखी तीन वर्षांनी देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असेल. त्या वेळी देशाची महिला श्रमशक्ती अधिक सकारात्मक, अधिक उत्पादक, अधिक सफल कार्यांमध्ये गुंतलेली असेल, अशी आशा करायला हरकत नाही. सरकारने त्यांच्या बाजूने पाऊल उचलले आहेच, पण नागरिक म्हणून आपणही या उद्दिष्टपूर्तीसाठी सहभाग दिला पाहिजे. पाण्याची बचत करणे, अधिकाधिक वृक्षारोपण करून निसर्गाची हानी कमी करण्याचा प्रयत्न करणे, केरकचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकणे आणि आपापल्या घरात शौचालये बांधून घेणे इतके साधे उपाय प्रत्येकाने केले, तरी देशहिताच्या दृष्टीने उचललेले ते महत्त्वाचे पाऊल ठरेल.

**विजया रहाटकर,** मुख्य संपादक आणि
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा

# राज्य महिला आयोगाला नवे सदस्य

## चंद्रिका चौहान, अनुसया गुप्ता, ज्योती भोये, रोहिणी नायडू, रिदा रशीद आणि गयाताई कराड यांची नियुक्ती



**चंद्रिका चौहान**



**अनुसया गुप्ता**



**ज्योती भोये**



**रोहिणी नायडू**



**रिदा रशीद**



**गयाताई कराड**

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्यपदी सहा जणांची नियुक्ती राज्य सरकारने केली आहे. त्यामधे चंद्रिका चौहान (सोलापूर), अनुसया गुप्ता (नागपूर), ज्योती भोये (जव्हार, जि. पालघर), रोहिणी नायडू (नाशिक), रिदा रशीद (मुंबई) आणि गयाताई कराड (परळी, जि. बीड) यांचा समावेश आहे. यापैकी गयाताई कराड यांची फेरनियुक्ती आहे.

आयोगाच्या अध्यक्षपदी श्रीमती विजया रहाटकर यांची यापूर्वीच फेरनियुक्ती झालेली आहे. नव्या सदस्यांच्या नियुक्तीची अधिसूचना १३ सप्टेंबर २०१९ रोजी राजपत्रात प्रसिद्ध झालेली आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा, १९९३ नुसार आयोगामधे सात सदस्य असतात. त्यानुसार सातही सदस्यांची नियुक्ती आता झालेली आहे. याशिवाय राज्याचे पोलिस महासंचालक हे आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतात. त्यानुसार पोलिस महासंचालक सुबोध कुमार जयस्वाल हे ही आयोगाचे सदस्य आहेत.

सोलापूरच्या चंद्रिका चौहान या 'उद्योगवर्धिनी' संस्थेच्या माध्यमातून महिलांसाठी दीर्घकाळ कार्यरत आहेत. नागपूरच्या अनुसया गुप्ता या महिला दक्षता समिती, 'लोकपंचायत'च्या माध्यमातून सक्रिय आहेत. जव्हारच्या ज्योती भोये या पंचायत समितीच्या माजी सभापती आहेत. आदिवासी महिलांसाठीचे त्यांचे काम आहे. नाशिकच्या रोहिणी नायडू या अनेक सामाजिक संस्थाशी निगडीत आहेत. विशेषत: आरोग्य क्षेत्रात त्यांचे मोठे काम आहे. मुंबईच्या रिदा रशीद यांनी अल्पसंख्यांक समूहातील महिलांसाठी उत्तम काम केले आहे. शिक्षण व कौशल्य यावर त्यांचा भर असतो. गयाताई कराड या ही मराठवाडयातील महिलांसाठी कार्यरत आहेत. या नव्या सदस्यांचे अध्यक्षा विजया रहाटकर यांनी स्वागत केले आहे. आयोगाच्या कामाला व वेगाला आणखी गती मिळेल, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

विंदा कीर्तीकर, देवयानी ठाकरे, नीता ठाकरे, ॲड आशा लांडगे या मावळत्या सदस्यांच्या योगदानाबद्दलही रहाटकर यांनी आभार मानले.

## साद दे, साथ घे - प्रतिसाद

**प्रिय वाचक,
साद दे, साथ घे, अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण 'साद'शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.**
saad.mscw@gmail.com

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com

महिला डिजिटल साक्षरता
POWER TO EMPOWER
महाराष्ट्र राज्य महिला आयोग

# 'प्रज्ज्वला' पाठोपाठ आता डिजिटल साक्षरता अभियान

## राज्यभरात पाचशे कार्यशाळा घेणार; अध्यक्षा विजया रहाटकर यांची माहिती

**पुणे :** बचत गटांच्या महिलांसाठी प्रशिक्षणाचा प्रज्ज्वला कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने डिजिटल साक्षरता अभियान हाती घेण्याचे ठरविले आहे. यामध्ये राज्यभरात पाचशे कार्यशाळा घेतल्या जाणार असून महिलांना, विशेषतः ग्रामीण महिलांना डिजिटल तंत्रज्ञानाची सफर घडवून आणली जाणार आहे.

या अभिनव उपक्रमाची सविस्तर माहिती देताना, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजय रहाटकर म्हणाल्या, ''एक महिला शिकली की ती संपूर्ण घराला शिक्षित करते आणि ती आपल्या घराबरोबरच इतरही चार घरांतील महिलांना शिक्षित करते. डिजिटल साक्षरता ही काळाची गरज आहे. म्हणूनच महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम आणि स्वावलंबी करायचे असेल तर डिजिटल साक्षर करणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्ही विविध स्वयंसेवी संस्था, महाविद्यालये यांच्या मदतीने राज्यभर पाचशे कार्यशाळा घेणार आहोत. त्यासाठी संस्थांना अनुदानही दिलेले आहे.''

श्रीमती रहाटकर पुढे म्हणाल्या, की डिजिटल साक्षरता म्हणजे रोजच्या जीवनात अर्थपूर्ण कार्य करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान समजण्याची आणि वापरण्याची कुठल्याही महिलेची, व्यक्तिची किंवा समाजाची क्षमता. भारताला डिजिटली सक्षम समाज बनविणे या महत्वाकांक्षी उद्देशाने सरकारने डिजिटल इंडिया कार्यक्रम सुरु केलेला आहे. ग्रामीण भागातील महिलांना या प्रवाहात पूर्णपणे समाविष्ट करणे, हा आयोगाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यशाळेत तज्ञ लोकांच्या मार्गदर्शनाखाली महिलांमध्ये डिजिटल सेवा आणि तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. प्रॅक्टिकल लर्निंगवर भर हे या कार्यशाळांचे वैशिष्ट्य राहील.

ग्रामीण भागातील महिलांना डिजिटल उपकरणांचा (स्मार्ट फोन्स) वापर, इंटरनेटचा कार्यक्षम वापर, दैनंदिन गरजेची महत्वपूर्ण अप्स (उदा. 'उमंग', 'आपले सरकार', 'ई-जीईएम', 'डिजीलॅकर', 'आयआरसीटीसी') डिजिटल पेमेन्ट (उदा. 'भीम', 'फोनपे'), सायबर सुरक्षा आदींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या अभियानासाठी आयोगाने ५० प्रशिक्षकांची फळीदेखील सज्ज केलेली आहे. त्यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षणही पुण्यात नुकतेच घेण्यात आलेले आहे. गेल्या काही महिन्यांत आयोगाने तीन महत्वपूर्ण उपक्रम राबविलेले आहेत. पालखी सोहळ्यांमध्ये 'वारी नारीशक्ती'ची या सॅनिटरी नॅपकिन्सच्या वापराबाबत जनजागृती, 'प्रज्वला' योजनेंतर्गत बचत गटांच्या महिलांना आर्थिक आणि कायदेशीर प्रशिक्षण आणि आता डिजिटल साक्षरता अभियान आयोजित केले जात आहे.









**डिजिटल साक्षरता अभियानासाठीच्या प्रशिक्षकांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण नुकतेच पुण्यामध्ये झाले.**



औरंगाबाद येथे ७ सप्टेंबरला झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी (मध्यभागी). डावीकडून एकनाथ शिंदे, सुभाष देसाई, पीयूष गोयल, भगतसिंग कोशियारी, देवेंद्र फडणवीस, रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे, चंद्रकांत पाटील, दादा भुसे, अतुल सावे.

# महिला बचतगटांना शून्य टक्के दराने कर्ज

## औरंगाबादमधील कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची घोषणा

**औरंगाबाद :** महिलांच्या कल्याणासाठी काम सुरूच आहे. आता महिलांच्या नेतृत्वात राष्ट्रनिर्माणाचे कार्य केले जाणार आहे. विविध योजनांच्या माध्यमातून सरकार महिलांची ताकद वाढवीत असून, त्यांच्या सबलीकरणासाठी बचतगटांना शून्य टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथे सांगितले. 'ऑरिक' या स्मार्ट औद्योगिक शहराच्या उद्घाटनानंतर सक्षम महिला मेळाव्याला पंतप्रधान मोदींनी शनिवारी (ता. सात) हजेरी लावली. समाजवादी नेते राम मनोहर लोहिया यांनी सांगितले होते, की पाणी आणि स्वच्छतागृह या महिलांच्या दोन समस्या सोडविल्या तर त्या देशाच्या समस्या सोडवतील. अनेक सरकारे त्यानंतर आली; पण आम्हीच हा निर्धार केला असून तो पूर्ण करून दाखवू. उज्ज्वला योजनेचे पाच कोटी जोडणीचे टार्गेट आठ कोटींवर नेण्यात आले आणि ते निर्धारित वेळेच्या सात महिने आधीच पूर्ण झाले. या योजनेतील आठ कोटीवे कनेक्शन आयेशा शेख यांना पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते औरंगाबादेत देण्यात आले. मराठवाड्याला पाण्याचे महत्त्व माहिती आहे. येत्या पाच वर्षांत पाण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या 'जल जीवन मिशन'वर साडेतीन लाख कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. मराठवाड्यासाठी वॉटरग्रीड हा प्रशंसनीय प्रयत्न आहे. जनधन खात्यावर रुपयाही नसताना आता पाच हजारांपर्यंतचे पतकर्ज उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.भारतातील पहिल्या ऑरिक या ग्रीनफिल्ड इंडस्ट्रीयल स्मार्ट सिटीचे लोकार्पण, ऑरिक हॉल, कमांड अँड कंट्रोल सेंटर, चॅटबोट, इ-लँड मॅनेजमेंट सिस्टिम इत्यादींचा शुभारंभ पंतप्रधानांनी केला.

### पंतप्रधान मोदी म्हणाले...

- प्रत्येक कुटुंबाला गॅस, पाच किलोच्या गॅसला प्रोत्साहन
- पाणी वाचविण्यासाठी, घरोघरी ते पोचविण्यासाठी कटिबद्ध
- २०२२ पर्यंत प्रत्येक घरी स्वच्छतागृह
- 'वॉटरग्रीड'मध्ये मराठवाडा मोठा लाभार्थी असेल
- प्रत्येक गावापर्यंत पिण्यासाठी, तर शेतापर्यंत सिंचनासाठी पाणी पोचेल
- बचतगटांच्या माध्यमातून कुटुंबाचीही सुधारतेय आर्थिक स्थिती
- २०२२ पर्यंत प्रत्येक गरिबाला पक्के घर देण्याच्या उद्दिष्टाकडे मार्गक्रमण
- 'चांद्रयान'मध्ये वैज्ञानिकांनी मेहनत घेतली. त्यातून शिकून पुढे जायचे.

> **"समाजवादी नेते राम मनोहर लोहियाजी यांनी ६०-७०च्या दशकात संसदेत भाषण दिले होते. ते म्हणाले होते की, हिंदुस्थानातील स्त्रियांपुढे दोन मोठ्या समस्या आहेत. आपण त्वरित त्याचे निराकरण केले पाहिजे. या गोष्टी ६०-७०च्या काळात लोहियाजींनी सांगितलेल्या आहेत. ते म्हणाले की, हिंदुस्थानातील महिलांच्या दोन प्रमुख समस्या आहेत, एक म्हणजे शौचालय आणि दुसरं पाणी. या दोन समस्या सोडवल्या गेल्या तर या देशातील महिला देशातील समस्या सोडविण्यासाठी शक्ती बनतील. लोहियाजी तर गेले, सरकारेसुद्धा आली आणि गेली, नेतेही आले आणि गेले. एक आम्हीच आहोत ज्यांनी असा निर्णय घेतलेला आहे की, प्रत्येक घरात शौचालये पण असतील आणि प्रत्येक घरात पाणीही असेल.**
>
> – **नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

# ५० लाख कुटुंबे बचत गटांशी संलग्न

## पाच वर्षांत ४७ लाखांनी वाढ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठवाड्याच्या इतिहासात आजचा दिवस औद्योगिक क्रांतीचा दिवस आहे. देशातील पहिली ऑरिक सिटी देशाला लोकार्पण करण्यात येत असल्याचा हा महत्त्वपूर्ण क्षण असल्याचे सांगून श्री.फडणवीस म्हणाले, शासनाने या कामासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिल्याने उद्योग विभागाने वेगाने काम पूर्ण केले. आज ऑरिक सिटीच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्त्वास गेले असून ऑरिक हॉलचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होत आहे. हा औद्योगिक विकासातील महत्त्वपूर्ण टप्पा आपण पार केला आहे. समृद्धी महामार्गामुळे जेएनपीटीच्या पोर्टवर चार तासात जाणे शक्य होणार आहे. त्यामुळे भविष्यात औरंगाबाद जालना इंडस्ट्रीयल मॅग्नेट होईल. कारण डीएमआयसी हे महत्त्वपूर्ण असून पंतप्रधानांनी नुकताच युएई सोबत सामंजस्य करार केला आहे तसेच रशियन, अमेरीकन, इतर देशाच्या विविध कंपन्या डीएमआयसी येथे येऊ इच्छित आहेत. त्याचप्रमाणे येथील ऑटो क्लस्टर हे देशातील उत्कृष्ट ऑटो क्लस्टर पैकी एक असे बनले आहे. औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र प्रगती करत आहे. त्यासोबतच मराठवाड्यामध्ये गेल्या चार पाच वर्षापासून सातत्याने दुष्काळ परिस्थिती आहे. तिच्यात बदल करण्यासाठी जलयुक्त अभियानाद्वारे जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहेत. आता ज्याप्रमाणे केंद्र सरकारने नर्मदा नदीचे पाणी कच्छ पर्यंत नेले त्याच धर्तीवर आपल्या नेतृत्वात आम्ही मराठवाड्याला दुष्काळमुक्त करणार आहे. कोकणातील समुद्रात वाहून जाणारे १६७ टीएमसी पाणी उचलून आम्ही मराठवाड्यातील गोदावरी नदीच्या बेसीनमध्ये आणून मोठ्या प्रमाणात पाण्याची उपलब्धता करून देणार आहोत.

महाराष्ट्रातील पहिल्या मराठवाडा वॉटर ग्रीडच्या माध्यमातूनही आम्ही पाण्याच्या प्रश्नावर मोठे काम करत आहोत. ६४ हजार कि.मी. पाईपलाइन टाकून त्याद्वारे मराठवाड्यातील प्रत्येक गावात, शहरात ३६५ दिवस पाणी उपलब्ध राहील. येत्या काळात ३० हजार करोड रू. खर्चून हे काम करण्यात येणार आहे. येत्या पाच वर्षात मराठवाड्याला दुष्काळमुक्त करू, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

बचत गटाची मोठी चळवळ राज्यात गेल्या काही वर्षात उभी राहिली असून आज घडीला ५० लाख कुटुंब बचतगटाशी जोडले आहेत. २०१४ मध्ये फक्त ३ लाख कुटुंबे बचत गटांशी जोडलेली होती. बचत गटांना उद्योजक बनवण्यासाठी नवीन योजना आणली आहे. यामध्ये ५० इंडस्ट्रियल पार्क आम्ही तयार करणार आहोत त्यामध्ये ३० टक्के जागा आम्ही महिला उद्योजक आणि बचत गटाच्या उद्योजकांसाठी राखीव ठेवणार आहोत. त्यासाठी ३०० कोटी रू. देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे कारण महिला बचत गट कर्ज परतफेड १०० टक्के आहे. त्यामुळे बिनव्याजी कर्ज बचत गटांना उपलब्ध करून देणार आहेत. सरस महालक्ष्मी प्रदर्शन, मॉल अशा वेगवेगळ्या माध्यमातून बचत गटांची चळवळ आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम, व्यापक करणार असल्याचे श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

## दुष्काळाच्या झळांतही शत-प्रतिशत कर्जफेड : मुंडे



**सक्षम महिलांच्या माध्यमातून हाताला काम देण्याचे कार्य महाराष्ट्रात वेगाने सुरू आहे. २०१४ मध्ये दहा जिल्ह्यांमध्ये असलेली या योजनेची व्याप्ती आता ३४ जिल्ह्यांमध्ये गेली आहे. सात लाख घरांशी असलेला संबंध वाढला, आता सरकार या माध्यमातून ४३ लाख ५५ हजार कुटुंबांना बळ देत आहेत. येथील महिलांनी दुष्काळाची झळ सोसूनही शत-प्रतिशत कर्जफेड केली. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे, असे ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.**

# महिला नेतृत्वातूनच राष्ट्र कल्याण साधणार



## औरंगाबाद येथील कार्यक्रमातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तपशीलवार भाषण...

व्यासपीठावर उपस्थित सर्व मान्यवर व दूरवरून मोठ्या संख्येने आलेल्या माता, बहिणी व मित्रांनो. मी पाहतोय की दूरदूरपर्यंत अनेक बहिणी उभ्या आहेत, कदाचित त्यांना व्यासपीठावरील काहीही दिसत नसेल; परंतु तरीही आपण इतक्या मोठ्या संख्येने आम्हाला आशीर्वाद द्यायला आला आहेत, मी मनापासून तुमचा खूप खूप आभारी आहे.

आपण सर्व जण देशाच्या विकासासाठी आपले गाव, खेडी आणि आपल्या कुटुंबास आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यात खूप मोठी भूमिका बजावत आहात. बचतगटांच्या माध्यमातून देशाचे सबलीकरण करण्यासाठी, नवीन भारत निर्माण करण्यात सहभागी झालेल्या सर्व बहिणींना मी नमस्कार करतो. आणि बहीण पंकजा यांचे विशेष अभिनंदन करतो.

मित्रांनो, औरंगाबादच्या विकासाशी निगडित महत्त्वाच्या इमारतीचे उद्घाटन झाले आहे. औरंगाबाद औद्योगिक शहराची मुख्य इमारत आता सेवेसाठी सज्ज झाली आहे. नवीन औरंगाबाद शहराची ही महत्त्वपूर्ण इमारत असेल. या इमारतीतून संपूर्ण औद्योगिक शहराच्या अनेक व्यवस्थांचे नियोजन होईल.

मित्रांनो, औरंगाबाद एक नवीन स्मार्ट सिटी बनत आहेच तसेच, हे देशातील औद्योगिक उपक्रमांचे एक मोठे केंद्रही बनणार आहे. दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरचाही हा एक महत्त्वाचा भाग असणार आहे. अनेक मोठ्या कंपन्यांनी येथे काम सुरू केले आहे. येत्या काळात आणखी कंपन्याही येथे येतील. या कंपन्या येथील लाखो तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणार आहेत.

मित्रांनो, औरंगाबाद आज आणखी एका मोठ्या कामगिरीचा साक्षीदार बनणार आहे. ही कामगिरी तुमची आहे. देशातील कोट्यावधी बहिणींची आहे.

आम्ही उज्ज्वला योजनेंतर्गत आठ कोटी मोफत गॅस कनेक्शन देण्याचा जो संकल्प केला होता तो आज या व्यासपीठावर या लाखो बहिणींच्या उपस्थितीत पूर्ण झाला आहे. आम्ही केवळ हे काम पूर्ण केले नाही, तर नियमित केलेल्या वेळापत्रकाच्या सात महिने आधीच हे लक्ष्य आम्ही गाठले आहे.

या आठ कोटी गॅस कनेक्शनपैकी महाराष्ट्रात जवळपास ४४ लाख कनेक्शन दिली गेली आहेत. या कामगिरीबद्दल मी आपल्या सर्वांना, देशातील प्रत्येक बहिणीला, जिला या धुरापासून मुक्ती मिळाली आहे  त्यांचे खूप खूप अभिनंदन करतो आणि त्यांनां शुभेच्छा देतो. ही योजना यशस्वी करण्यासाठी देशभरातून आलेल्या सहकाऱ्यांनाही मी प्रणाम  करतो ज्यांनी यासाठी परिश्रम घेतले आणि मदत केली.

मित्रांनो, धुरात अडकलेल्या आमच्या गरीब बहिणींना मदत करण्यासाठी



प्रथम पाच कोटी गॅस कनेक्शन मोफत देण्याचे लक्ष्य आम्ही केले होते. गेल्या वर्षी मार्चमध्ये हे लक्ष्य आठ कोटींपर्यंत वाढविण्यात आले होते. निवडणुकीच्या वेळी मी जेव्हा जेव्हा तुमच्याबरोबर आलो तेव्हा तेव्हा मी हे लक्ष्य गाठण्याबद्दल बोललो होतो. सरकार स्थापन झाल्यापासून १०० दिवसांच्या आतच हे काम पूर्ण झाल्याने मला समाधान वाटत आहे.

मित्रांनो, हे काम फक्त कनेक्शन देण्यापुरते मर्यादित नव्हते. यासाठी अधिक विस्तृत व्यवस्था केली गेली, समग्र कामे केली गेली. त्यासाठी फारच मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची आवश्यकता होती, जे अत्यंत कमी काळात तयार केले गेले. यासाठी तयार करण्यात आलेल्या १० हजार नवीन एलपीजी वितरकांपैकी बहुतेकांची खेड्यांमध्ये नियुक्ती करण्यात आली होती, एवढेच नाही तर गॅस सिलिंडरची कमतरता भासू नये यासाठी देशभरात नवीन एलपीजी बॉटलिंग प्लांट्स स्थापन करण्यात आले. बंदरांच्या आसपास टर्मिनल क्षमता वाढविण्यासह सरकारने गॅस पाइपलाइनच्या नेटवर्कचाही विस्तार केला.

मित्रांनो, आमचा प्रयत्न आहे की देशात असे कोणतेही कुटुंब राहू नये ज्यांच्या घरात एलपीजी कनेक्शन पोहोचलेले नाही. यासह ही योजना अधिक सोयीस्कर करण्यासाठी ५ किलो सिलिंडरची जाहिरातही केली जात आहे. देशातील बऱ्याच भागात पाइपमधून गॅस पोहोचवण्याचे कामही जोरात सुरू आहे.

बंधूनो आणि भगिनींनो, आता आम्ही एका मोठ्या मोहिमेवर निघालो आहोत, जी तुमच्या सर्वांशी थेट संबंधित आहे, देशातील कोट्यावधी बहिणींशी संबंधित आहे. तुम्हा सर्व बहिणींना पाण्यासाठी जो त्रास सहन करावा लागतो त्याची मला चांगलीच जाणीव आहे. देशातील प्रत्येक बहिणीची या समस्येपासून मुक्तता करण्यासाठीच जलजीवन अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत पाणी वाचवण्यासाठी आणि प्रत्येक घरोघरी पाणी पोचविण्यासाठी संपूर्ण देश कटिबद्ध आहे. येत्या पाच वर्षांत या पाणी मोहिमेवर सुमारे साडेतीन लाख कोटी रुपये खर्च करणार असल्याचे सरकारने निश्चित केले आहे.

तुम्ही कदाचित ऐकले असेल की समाजवादी नेते राम मनोहर लोहियाजी यांनी ६०-७०च्या दशकात संसदेत भाषण दिले होते. ते म्हणाले होते की, हिंदुस्थानातील स्त्रियांपुढे दोन मोठ्या समस्या आहेत. आपण त्वरित त्याचे निराकरण केले पाहिजे. या गोष्टी ६०-७०च्या काळात लोहियाजींनी सांगितलेल्या आहेत. कोणत्या दोन समस्यांचा उल्लेख त्यांनी केला - ते म्हणाले की, हिंदुस्थानातील महिलांच्या दोन प्रमुख समस्या आहेत, एक म्हणजे शौचालय आणि दुसरं पाणी. म्हणजेच महिलांसाठी शौचालय नाही आणि महिलांना घर चालवण्यासाठी पाणी उपलब्ध नाही. या दोन समस्या सोडवल्या गेल्या तर या देशातील महिला देशातील समस्या सोडविण्यासाठी शक्ती बनतील. लोहियाजी तर गेले, सरकारेसुद्धा आली आणि गेली, नेतेही आले आणि गेले. एक आम्हीच आहोत ज्यांनी असा निर्णय घेतलेला आहे की, प्रत्येक घरात शौचालये पण असतील आणि प्रत्येक घरात पाणीही असेल.

मराठवाड्याचा हा भाग त्याचा सर्वांत मोठा लाभार्थी ठरणार आहे आणि आपण सर्वजण देवेंद्रजी यांच्या सरकारसमवेत कौतुकास्पद प्रयत्न करत आहात. आता देवेंद्रजींनी विस्तृतपणे सांगितले आहे की, या भागात पाणी आणण्याचे कोणते स्वप्न त्यांच्या मनात आहे, याचे त्यांनी आपल्यासमोर खोलवर वर्णन केले आहे. मराठवाड्यात बांधली जाणारी पहिली वॉटर ग्रीड हा एक कौतुकास्पद प्रयत्न आहे. जेव्हा हे ग्रीड तयार होईल तेव्हा या भागातील पाण्याची उपलब्धता वाढेल. यामुळे प्रत्येक गावाला पिण्याचे पाणी, प्रत्येक शेतीला सिंचनाचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल.

मित्रांनो, केंद्र व राज्य सरकारे शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा पुरविण्याबरोबरच अनेक पावले उचलत आहेत. प्रत्येक शेतकरी कुटुंबाच्या बँक खात्यात थेट मदत, वयाच्या ६० वर्षानंतर शेतकऱ्यांना पेन्शन देण्याची सुविधा, पशुधन निरोगी ठेवण्यासाठी लसीकरण मोहीम असे अनेक प्रयत्न केले जात आहेत.

बंधूनो आणि भगिनींनो, गावाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी तुमचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. बचतगट, महिला बचतीच्या घटकांच्या रूपात तुम्ही करीत असलेले काम, त्याद्वारे तुमचे सक्षमीकरण, आर्थिक सबलीकरण तर होतच आहे, कौटुंबिक परिस्थितीही सुधारत आहे. जेव्हा कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम होते, तेव्हा देशाची शक्ती आपोआपच वाढते.

मित्रांनो, देशाच्या विकासातील हीच भूमिका लक्षात घेता, गेल्या पाच वर्षांत या चळवळीचा अधिकाधिक विस्तार करण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले. दीन दयाल उपाध्याय ग्रामीण आजीविका मिशनच्या माध्यमातून महिलांसाठी नवीन उद्योजकता संधी निर्माण करण्यात येत आहेत. नवीन भारतात आम्ही महिलांच्या कल्याणाबरोबरच महिलांना नेतृत्वाच्या संधी देऊन त्याद्वारे राष्ट्र कल्याणाचा विचार करीत आहोत.

म्हणूनच यावर्षीच्या अर्थसंकल्पात बचतगटांसाठी महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या आहेत. महिला बचतगटासाठी व्याजावर जे अनुदान मिळत होते ते आता संपूर्ण देशभरात राबविण्यात येत आहे. तसेच ज्या गटाच्या सदस्यांकडे जन-धन बँक खाते आहे त्यांना पाच हजार रुपयांपर्यंतच्या ओव्हरड्राफ्टची अतिरिक्त सुविधा मिळेल. आता तुम्हाला कोणत्याही सावकारांकडून जास्त व्याजाने पैसे घ्यावे लागणार नाहीत. याचा अर्थ असा आहे की आपल्या बँक खात्यात एकही पैसा जमा नसेल, तरीही आपण आपल्या गरजेसाठी त्यामधून पाच हजार रुपये काढू शकता. हे एक प्रकारचे सोपे कर्ज आहे, ज्यांची सुविधा जन-धन खात्यावर उपलब्ध असेल.

तसेच मुद्रा योजनेंतर्गत प्रत्येक बचतगटातील एका महिला सदस्याला १ लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळणार आहे. त्यामुळे तिला आपला व्यवसाय सुरू करण्यास किंवा वाढविण्यास मदत होईल.

मुद्रा योजना बहिणींना उद्योजक बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या योजनेंतर्गत देशभरात सुमारे २० कोटी कर्ज वितरित करण्यात आले आहे. त्यापैकी सुमारे १४ कोटी कर्ज आमच्या बहिणी आणि मुलींकडे गेले आहे. महाराष्ट्रातही मुद्रा योजनेतील दीड कोटी लाभार्थींपैकी सव्वा कोटी लाभार्थी आमच्या माता व भगिनी आहेत. महिला उद्योजकतेच्या क्षेत्रात येणारा हा बदल आम्हाला अधिक वेगवान आणि बळकट करायचा आहे. यासाठी शासन स्तरावर जी पावले उचलावी लागणार आहेत ती उचलली जातील.



मित्रांनो, एक बचतगट म्हणून आपण आर्थिक सबलीकरणासाठी एक मजबूत माध्यम आहातच, तसेच आपण सामाजिक परिवर्तनासाठी एक महत्त्वपूर्ण घटक आहात. मुलींचे जीव वाचविण्यापासून, त्यांच्या अभ्यासापर्यंत आणि त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. येथे देवेन्द्रजी यांच्या सरकारने या दिशेने कौतुकास्पद काम केले आहे; परंतु केवळ सरकारी योजना आणि कायदे पुरेसे नाहीत. आपल्याला मुलींबाबत समाजाच्या विचारसरणीत सर्वसमावेशक बदल घडवून आणण्याची गरज आहे. यात आपल्या बहिणी आणि मुलींची भूमिकाही महत्त्वाची आहे.

अलीकडे आपण पाहिले आहे की मुस्लिम बहिणींना तिहेरी तलाकच्या दुष्परिणामातून मुक्त करण्यासाठी कडक कायदा करण्यात आला आहे. आता तुम्हाला या कायद्याबद्दल समाजात जागरूकता पसरवावी लागेल.

मित्रांनो, जेव्हा आपण वेळेआधी लक्ष्य प्राप्त करतो, तेव्हा मोठे संकल्प सिद्ध करण्यासाठी आपले धैर्य आपोआप वाढते. जेव्हा प्रामाणिकपणे काम केले जाते, चांगल्या हेतूने काम केले जाते, तेव्हा प्रयत्नांमधेही कोणतीच कमतरता नसते. तुम्हाला सगळ्यांनाच चांद्रयानच्या बाबतीत जे घडले त्याची माहिती असेल. चांद्रयानच्या बाबतीत काय घडले याची तुम्हा सर्वांना चांगलीच कल्पना असेल. आपल्या शास्त्रज्ञांनी एक मोठे लक्ष्य साध्य करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु त्यात एक अडथळा आला. या अभियानासाठी शास्त्रज्ञ प्रयत्न करत होते.

बंधूनो आणि भगिनींनो, काल रात्री आणि आज सकाळी मी त्यांच्यामध्ये होतो. ते भावुक झाले होते परंतु त्याच वेळेस आता अधिक वेगाने काम केले पाहिजे; अशा खूप आशा-आकांक्षा त्यांच्यात होत्या. जे घडले त्यापासून शिकायचे आणि पुढे जायचे. इसरोसारख्या बांधिलकीनेच, देशाला पुढे नेले जाऊ शकते, लोकांचे जीवन सोपे केले जाऊ शकते.

मित्रांनो, वेगवेगळ्या क्षेत्रातील अशा उत्कट लोकांच्या बांधिलकीमुळे, देशातील प्रत्येक गावाला वीजपुरवठा करणे, आठ कोटी कुटुंबांना गॅस कनेक्शन देणे अशी अनेक कामे वेळेच्या आधी पूर्ण झाली आहेत. आता लवकरच संपूर्ण देश स्वत:ला उघड्यावर शौच करण्यापासून मुक्त झाल्याचे घोषित करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. मला खात्री आहे की २०२२ मध्ये जेव्हा आपण स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरी करत असू तेव्हा आपण केलेले संकल्प पूर्ण होतील.

बंधूंनो आणि भगिनींनो, २०२२पर्यंत प्रत्येक गोरगरिबांना छप्पर देण्याच्या आमच्या उद्देश्याकडे आम्ही वेगाने वाटचाल करत आहोत. आतापर्यंत देशातील खेड्यांमध्ये व शहरांमध्ये सुमारे १ कोटी ८० लाख घरे बांधली गेली आहेत. लाभार्थी तेथे राहण्यास स्थलांतरित झाले आहेत. बरेच लोक आम्हाला विचारतात की गरिबांच्या घराची योजना यापूर्वीही चालविली गेली होती, निधी आधीही होते पण त्यात तुम्ही वेगळे काय केले?

सर्वप्रथम, मला हे सांगायचे आहे की आम्हाला हे समजले होते की, आम्हाला घरे (House) बांधायची नाहीत, तर घरकुल (Home) निर्माण करायची आहेत. चार भिंतींनी वेढलेली घरे नाहीत, तर तुमच्या स्वप्नातले घर बांधायचे आहे. आम्हाला अशी घरे बांधायची होती जेथे सर्व सुविधा उपलब्ध आहेत. म्हणजेच घराच्या नावाखाली चार भिंती उभ्या करण्याऐवजी आम्हाला आणखी काहीतरी चांगले करण्याची आवश्यकता होती. कमीतकमी वेळेत, तसेच कमी किमतीत जास्तीत जास्त सुविधा देण्याचा आमचा मानस होता.

आमच्या सरकारने घरे बांधताना तेथील लोकांच्या इच्छेनुसार, स्थानिक लोकांच्या गरजा लक्षात घेऊन घरे बांधण्याचे नियोजन केले. घरात सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा मिळाव्यात म्हणून आम्ही विविध सरकारी योजना एकत्रित केल्या. जेणेकरून त्या घरांमध्ये वीज, गॅस कनेक्शन, शौचालये आणि अशा सर्व सुविधा एकत्रित मिळू शकतील.

ही घरे लोकांच्या अपेक्षांनुसार बनवीत यासाठीच आम्ही तुम्हा सर्व लोकांच्या गरजा ऐकून घेतल्या. यानंतर केवळ घराचे क्षेत्र वाढवले नाही तर बांधकामाची रक्कमही वाढविण्यात आली. आम्ही या प्रक्रियेत स्थानिक कारागीर आणि मजूर देखील समाविष्ट केले, जसे की - बर्याच स्त्रियादेखील आज, जर झारखंडला गेलात तर राणी मिस्त्री हा शब्द तुम्हाला ऐकू येईल. कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय कमीतकमी वेळेत घरांच्या वितरणावरही आम्ही लक्ष केंद्रित केले. यासाठी तंत्रज्ञानाचा महत्त्वाचा भाग म्हणून अवलंब केला गेला.

आम्ही अशा लोकांच्या स्वप्नांनाही दृढ करण्याचा प्रयत्न केला जे स्वत:चे घर स्वतः विकत घेऊ इच्छितात. स्वस्त घरांना आणखी चालना देण्यासाठी सरकारने घरासाठी काढलेल्या कर्जावरील (Home Lone) दीड लाख रुपयांच्या व्याजावर प्राप्तिकरात अतिरिक्त सवलत देण्याची योजना राबवली. जेणेकरून मध्यमवर्गीय कुटुंबातील लोक त्यांचे घर घेऊ शकतील.

आमचा भर पारदर्शकता ठेवण्यावरही होता. घरांच्या बांधकामाच्या वेगवेगळ्या टप्प्यांची छायाचित्रे, ऑनलाइन अपलोड केली गेली. प्रशासनाला पारदर्शक पद्धतीने अचूक माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. एवढेच नव्हे तर रिअल इस्टेटच्या क्षेत्रात पारदर्शकतेचा अभावही होता. यामुळे घरे खरेदी करणाऱ्या लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. रेरा कायदा आणून सरकारने घर खरेदीदारांचा विश्वास वाढवण्याचे काम केले आहे. आज बहुतेक राज्यांमध्ये रेरा कायद्याची अधिसूचना देण्यात आली आहे. न्यायाधिकरणही कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत लाखो नवीन सदनिका बांधण्यात येत आहेत.

आम्ही घरांबाबत एक समग्र दृष्टिकोन ठेऊन काम केले आहे. जर आम्ही प्रत्येक वेळेस वेगवेगळ्या, एक-एक योजना घेऊन समोर आलो असतो तर इतके मोठे यश मिळवणे कठीण होते. मोठ्या प्रमाणात समाधान मिळवणे तेव्हाच शक्य आहे जेव्हा सर्व विभाग, सर्व निर्णय, एक मोठे लक्ष्य विचारात घेऊन केले जातात. सर्व मंत्रालये आणि सर्व योजना एकाच मार्गावर एकत्र काम करतात. ही आमच्या सरकारच्या कामकाजाची मुख्य ओळख आहे - तुकड्यांमध्ये नव्हे तर एकत्रतेचा विचार करा आणि सर्वांना एकत्र घेऊन काम करा. मित्रांनो, गेल्या ५ वर्षात स्वच्छतेपासून ते बँकेच्या व्यवहारापर्यंत, समाजाच्या वागणुकीत बदल करण्यासाठी केल्या गेलेल्या सर्व जनआंदोलनात तुम्ही मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. हेच कारण आहे की, येणाऱ्या पाच वर्षांसाठी जे संकल्प केले गेले आहेत त्यांच्या पूर्ततेसाठी तुमच्यावर माझा खूप विश्वास आहे. हा विश्वास सतत दृढ होत राहील. याच अपेक्षेने तुमचे खूप खूप धन्यवाद.

धन्यवाद आणि या उत्सवाच्या दिवशी इतक्या मोठ्या संख्येने माता-भगिनींनी आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी येणे, ही आमच्यामध्ये शक्ती निर्माण करणारी भावना आहे. या मातृशक्तीला प्रणाम करून मी माझे भाषण थांबवतो.

**(अनुवाद : प्राची एक्के)**

# आयोगाच्या सजगपणामुळे निवळला तीव्र तणाव

## चुनाभट्टी अत्याचारप्रकरणी तपासासाठी 'एसआयटी' नेमण्याचा रहाटकर यांचा आदेश

साद प्रतिनिधी, मुंबई

जालना जिल्ह्यातील युवतीवर मुंबईतील चुनाभट्टी पोलिस स्थानकाच्या हद्दीमध्ये घडलेल्या अत्याचारानंतर झालेल्या मृत्यूघटनेची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने यापूर्वीच स्वाधिकारे दखल घेतलेली आहे. तशी नोटीसही मुंबई पोलिसांना २९ ऑगस्ट रोजी बजावलेली आहे.

मुंबईत घडलेल्या या घटनेनंतर पीडित तरुणीचे कुटुंबीय संतप्त झाले होते. त्यांनी मृतदेहाचे विच्छेदन करण्यास नकार दिला होता. हे प्रकरण चिघळण्याची चिन्हे होती, मात्र आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पुढाकार घेऊन पीडितेच्या कुटुंबीयांशी चर्चा केली. तिचे भाऊ व अन्य कुटुंबीय यांची समजूत घातली. त्यासाठी दिवसभर पोलिस, पीडितेचे कुटुंबीय आणि अध्यक्ष रहाटकर यांच्यात बैठका झाल्या. काही संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे हे प्रकरण चिघळण्याची दाट शक्यता निर्माण झाली होती. मात्र, रहाटकर यांच्या मध्यस्थीमुळे हा तणाव निवळला. त्यानंतर पीडितेच्या कुटुंबीयांनी मृतदेहाचे विच्छेदन करण्याची परवानगी दिली.

या घटनेसंदर्भात ३१ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी पीडित युवतीचे बंधू, त्यांचे अन्य नातेवाईक व सहकारी यांची भेट घेतली. त्यांचे सांत्वन केले आणि न्याय मिळवून देण्याचा दिलासा दिला. त्या दृष्टीकोनातून रहाटकर यांनी चुनाभट्टी पोलिस स्थानकाच्या कार्यालयात मुंबईचे पोलिस आयुक्त संजय बर्वे, अतिरिक्त पोलिस आयुक्त लख्मी गौतम, पोलिस उपायुक्त शशी मीना यांच्या उपस्थितीत बंधू, त्यांचे नातेवाईक आणि सहकारयांशी तपशीलवार चर्चा केली. या चर्चेमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय झाले :

१. पीडितेच्या कुटुंबीयांची मागणी लक्षात घेऊन आणि पीडितेला न्याय मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून या घटनेचा तपास 'सीबी-सीआयडी'कडे त्वरित सोपविण्यात येईल. 'सीबी-सीआयडी'कडून त्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) नेमले जाईल.

२. पीडितेचे बंधूला पोलिस संरक्षण दिले जाईल.


३. या घटनेचा प्रारंभिक तपास करताना मुंबईच्या पोलिस निरीक्षक श्रीमती शिर्के यांनी भावाला नीट वागणूक दिली नसल्याचा आरोप लक्षात घेऊन त्यांची चौकशी करावी आणि त्याआधारे योग्य ती कारवाई करावी.

४. औरंगाबादच्या घाटी रुग्णालयात तज्ज्ञ, निष्णात डाक्टरांच्या पथकाने शवविच्छेदन (पोस्ट मार्टेम) करावे. हे शवविच्छेदन करताना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा काटेकोर अवलंब करावा. या शवविच्छेदनाला बंधू आणि त्यांच्या पालकांनी संमती दिलेली आहे.

५. औरंगाबादमधील घाटी रूग्णालयातील डाक्टरांनी पीडितेच्या कुटुंबीयांना नीट वागणूक दिली नाही, हा आरोप लक्षात घेऊन संबंधित डाक्टरांची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी.

६. या घटनेमध्ये 'मनोधैर्य' योजनेतंर्गत पीडितेच्या कुटुंबीयांना आर्थिक सहाय्य त्वरित दिले जावे. त्यासाठी सर्व प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या निर्देश संबंधितांना दिले आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ अंतर्गत कलम १०(१)(क) (एक) व (दोन) आणि कलम १०(२) अन्वये आयोगाने ही कार्यवाही केलेली आहे.



महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
Maharashtra State Commission For Women

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग) पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.) Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

**प्रसिद्धीसाठी**

**चुनाभट्टी अत्याचारप्रकरणी 'एसआयटी' नेमणार**
**राज्य महिला आयोगाचे मुंबई पोलिसांना निर्देश; नातेवाईकांना पोलिस संरक्षणही**

**मुंबई, दि. ३१ ऑगस्ट २०१९ :**

जालना जिल्ह्यातील युवतीवर मुंबईतील चुनाभट्टी पोलिस स्थानकाच्या हद्दीमध्ये घडलेल्या अत्याचारानंतर झालेल्या मृत्यूघटनेची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने यापूर्वीच स्वाधिकारे दखल घेतलेली आहे. तशी नोटीसही मुंबई पोलिसांना दि. २९ रोजी बजावलेली आहे.

या घटनेसंदर्भात आज, दि. ३१ ऑगस्ट २०१९ रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी पीडित युवतीचे बंधू, त्यांचे अन्य नातेवाईक व सहकारी यांची भेट घेतली. त्यांचे सांत्वन केले आणि न्याय मिळवून देण्याचा दिलासा दिला. त्या दृष्टीकोनातून श्रीमती रहाटकर यांनी चुनाभट्टी पोलिस स्थानकाच्या कार्यालयात मुंबईचे पोलिस आयुक्त श्री संजय बर्वे, अतिरिक्त पोलिस आयुक्त श्री लख्मी गौतम, पोलिस उपायुक्त श्री शशि मीना यांच्या उपस्थितीत बंधू, त्यांचे नातेवाईक आणि सहकाऱ्यांशी तपशीलवार चर्चा केली. या चर्चेमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय झाले :

१. पीडितेच्या कुटुंबीयांची मागणी लक्षात घेऊन आणि पीडितेला न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीकोनातून या घटनेचा तपास 'सीबी-सीआयडी'कडे त्वरीत सोपविण्यात येईल. 'सीबी-सीआयडी'कडून त्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) नेमले जाईल.

# निर्भया प्रकरणाची आठवण

पीडित मुलगी ही मूळची जालना जिल्ह्याची रहिवासी आहे. पीडित महिलेचा भाऊ हा मुंबईतल्या चेंबूर परिसरात राहत होता. भावाच्या मुलाला सांभाळण्यासाठी ती मुंबईत आली होती. सात जुलैला भावाच्या मुलाला ताप आला म्हणून त्याला एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यादिवशी पीडित मुलगी घरी एकटीच होती. यावेळी तिला कुणीतरी फोन करून बाहेर बोलावून घेतले आणि गुंगीचे औषध देऊन चार जणांनी बलात्कार केला.

घाबरलेल्या पीडितेने हा प्रकार घडल्यानंतर घरी काहीच सांगितलं नाही. वेदना सहन करत ती तशीच झोपून राहिली. दोन दिवसानंतर तिचे पाय लुळे पडू लागले. त्यानंतर घरच्यांनी तिला डॉक्टरांकडे नेलं. डॉक्टरांनी हा प्रकार अर्धांगवायूचा नसून वेगळं काहीतरी असल्याने तिला मोठ्या रुग्णालयात नेण्यास सांगितलं. तेव्हा मुलीच्या वडिलांनी मुलीला औरंगबादच्या घाटी रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी तपासणी करून मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याचे सांगितले. त्यानंतर पीडितेने चार जणांनी काहीतरी पाजून आपल्यावर बलात्कार केल्याचे सांगितले. मुलीने हा प्रकार सांगितल्यानंतर तिच्या वडिलांनी बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला. हाच गुन्हा मुंबईतील चुनाभट्टी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. बलात्कारानंतर पावणेदोन महिन्यांनी या तरुणीने औरंगाबादमधील रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.




**पीडितेच्या मृत्यूनंतर चुनाभट्टी पोलिस ठाण्याबाहेर जमलेल्या जमावाचे संग्रहित छायाचित्र.**

### पोलिस अधिकाऱ्यावर अट्रॉसिटीचा गुन्हा

**चुनाभट्टी सामूहिक बलात्कार प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. तपासासाठी अनुभवी अधिकाऱ्यांचे पथक नेमण्यात आले आहे. पीडितेच्या भावाला जातिवाचक अपशब्द वापरल्याप्रकरणी चुनाभट्टी पोलिस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी पोलिस निरीक्षक दीपक सुर्वे यांच्याविरोधात अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# महिला बचतगटांना २०० कोटींचे खेळते भांडवल

**मुंबई :** राज्य शासनाने महिला बचत गटांना २०० कोटी रुपयांचे खेळते भांडवल दिले आहे. यामुळे बचत गटांमार्फत स्वयंरोजगारासाठी सुरु करण्यात आलेल्या विविध उपक्रमांना मोठ्याप्रमाणावर सहाय्य झाले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत या बाबतचा निर्णय झाला. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी अर्थमंत्रालयामार्फत याबबतची तरतूद केली. या बचत गटांच्या मार्फत महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी राज्यात गेल्या पाच वर्षात विशेष प्रयत्न करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून बचत गटातील १ लाख १४ हजार महिलांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षणही देण्यात आले.


बचत गटाच्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यावर विशेष भर देण्यात आल्याने २०१४ नंतर ३ लाख ९७ हजार १३७ बचतगटांची निर्मिती झाली. यातील लाभार्थी कुटुंबांची संख्या ३२ लाख ८६ हजार १४६ इतकी आहे. याच कालावधीत २६ हजार ४६५ समूह गट आणि ६८८८ ग्रामसंघाची स्थापना करण्यात आली.



# चांदा ते बांदा...
# यात्रा ‘प्रज्ज्वला’ची

## राज्यभरातील प्रशिक्षण कार्यक्रमांची उत्साही सांगता

**महिला बचतगटांकडून दर्जेदार उत्पादने तयार करवून घेणे आणि त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या प्रज्ज्वला योजनेच्या प्रशिक्षण कार्यक्रमांची नुकतीच सांगता झाली. राज्यातील २९ जिल्ह्यांत १०० कार्यक्रम घेण्यात आले. त्यातून सुमारे तीन लाख महिलांशी थेट संवाद साधण्यात आला. आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. फेब्रुवारीमध्ये राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमांची सुरुवात करण्यात आली होती. मीरा भाईंदर येथे ११ सप्टेंबरला झालेला कार्यक्रम समारोपाचा ठरला.**




| | |
|---|---|
| २९ | जिल्हे |
| १०० | प्रशिक्षण कार्यक्रम |
| १२६०७ | कि.मी प्रवास |

# यात्रा 'प्रज्वला'ची

| क्र. | दिनांक | विधानसभा |
|---|---|---|
| १. | १५ जून १९ | नंदूरबार |
| २. | १५ जून १९ | शहादा |
| ३. | १६ जून १९ | धुळे |
| ४. | १६ जून १९ | शिंदखेडा |
| ५. | १७ जून १९ | नाशिक (१) |
| ६. | १७ जून १९ | नाशिक (२) |
| ७. | २३ जून १९ | सावंतवाडी |
| ८. | २३ जून १९ | कणकवली |
| ९. | २४ जून १९ | रत्नागिरी |
| १०. | २४ जून १९ | गुहागर |
| ११. | ९ जुलै १९ | शिराळा |
| १२. | ९ जुलै १९ | इस्लामपूर |
| १३. | १० जुलै १९ | सांगली |
| १४. | १० जुलै १९ | मिरज |
| १५. | ११ जुलै १९ | जत |
| १६. | ११ जुलै १९ | तासगांव |
| १७. | १७ जुलै १९ | कर्जत |
| १८. | १७ जुलै १९ | नगर |
| १९. | १८ जुलै १९ | पाथर्डी |
| २०. | १८ जुलै १९ | नेवासे |
| २१. | १८ जुलै १९ | श्रीरामपूर |
| २२. | १९ जुलै १९ | कोपरगाव |
| २३. | १९ जुलै १९ | लोणी |
| २४. | १९ जुलै १९ | राहुरी |
| २५. | १७ जुलै १९ | पाथरी |
| २६. | १७ जुलै १९ | परभणी |
| २७. | १८ जुलै १९ | नांदेड |
| २८. | १८ जुलै १९ | लोहा |
| २९. | १९ जुलै १९ | मुखेड |
| ३०. | १९ जुलै १९ | नायगाव |
| ३१. | २२ जुलै १९ | डहाणू |
| ३२. | २२ जुलै १९ | विक्रमगड |
| ३३. | २३ जुलै १९ | भोसरी |
| ३४. | २४ जुलै १९ | चिंचवड |
| ३५. | २४ जुलै १९ | मावळ |
| ३६. | २४ जुलै १९ | अकोल १ |
| ३७. | २४ जुलै १९ | अकोट |
| ३८. | २५ जुलै १९ | मुर्तिजापूर |
| ३९. | २५ जुलै १९ | कारंजा |
| ४०. | २५ जुलै १९ | चाळीसगांव |
| ४१. | २५ जुलै १९ | अमळनेर |
| ४२. | २६ जुलै १९ | जळगाव |
| ४३. | २६ जुलै १९ | भुसावळ |
| ४४. | २६ जुलै १९ | मुक्ताईनगर |
| ४५. | २६ जुलै १९ | वाशिम |
| ४६. | २६ जुलै १९ | रिसोड |
| ४७. | २७ जुलै १९ | रावेर |
| ४८. | २७ जुलै १९ | जामनेर |
| ४९. | ३१ जुलै १९ | भंडारा |
| ५०. | ३१ जुलै १९ | तुमसर |
| ५१. | ३१ जुलै १९ | साकोली |
| ५२. | १ ऑगस्ट १९ | अर्जुनी(गोंदिया) |
| ५३. | १ ऑगस्ट १९ | तिरोरा(गोंदिया) |
| ५४. | २ ऑगस्ट १९ | गोंदिया |
| ५५. | २ ऑगस्ट १९ | आमगाव |
| ५६. | ५ ऑगस्ट १९ | लातूर शहर |
| ५७. | ५ ऑगस्ट १९ | औसा |
| ५८. | ५ ऑगस्ट १९ | निलंगा |
| ५९. | ६ ऑगस्ट १९ | दर्यापूर(अमरावती) |
| ६०. | ६ ऑगस्ट १९ | अमरावती |
| ६१. | ६ ऑगस्ट १९ | उदगीर (लातूर) |
| ६२. | ६ ऑगस्ट १९ | अहमदपूर |
| ६३. | ६ ऑगस्ट १९ | रेणापूर |
| ६४. | ७ ऑगस्ट १९ | मोर्शी(अमरावती) |
| ६५. | ७ ऑगस्ट १९ | धामणगाव रेल्वे |
| ६६. | ८ ऑगस्ट १९ | मोहोळ |
| ६७. | ८ ऑगस्ट १९ | माळशिरस |
| ६८. | २१ ऑगस्ट १९ | केज (बीड) |
| ६९. | २१ ऑगस्ट १९ | अंबाजोगाई |
| ७०. | २२ ऑगस्ट १९ | माजलगाव(बीड) |
| ७१. | २२ ऑगस्ट १९ | गेवराई (बीड) |
| ७२. | २३ ऑगस्ट १९ | बीड |
| ७३. | २३ ऑगस्ट १९ | आष्टी |
| ७४. | २४ ऑगस्ट १९ | परळी |
| ७५. | २५ ऑगस्ट १९ | मुंबई शहर |
| ७६. | २६ ऑगस्ट १९ | बोरीवली |
| ७७. | २६ ऑगस्ट १९ | चेंबूर |
| ७८. | २६ ऑगस्ट १९ | मुलुंड |
| ७९. | २७ ऑगस्ट १९ | कराड (सातारा) |
| ८०. | २७ ऑगस्ट १९ | सातारा |
| ८१. | २७ ऑगस्ट १९ | वाई |
| ८२. | २८ ऑगस्ट १९ | शिरूर |
| ८३. | २८ ऑगस्ट १९ | पुणे शहर |
| ८४. | २८ ऑगस्ट १९ | अहेरी |
| ८५. | २८ ऑगस्ट १९ | गडचिरोली |
| ८६. | २९ ऑगस्ट १९ | चंद्रपूर |
| ८७. | २९ ऑगस्ट १९ | बल्लारपूर |
| ८८. | २९ ऑगस्ट १९ | राजूरा |
| ८९. | ३० ऑगस्ट १९ | हिंगणा |
| ९०. | ३० ऑगस्ट १९ | नागपूर |
| ९१. | ३० ऑगस्ट १९ | कामठी |
| ९२. | ३१ ऑगस्ट १९ | हिंगणघाट |
| ९३. | ३१ ऑगस्ट १९ | वर्धा |
| ९४. | ३१ ऑगस्ट १९ | पनवेल |
| ९५. | ३१ ऑगस्ट १९ | उरण |
| ९६. | ३१ ऑगस्ट १९ | ठाणे |
| ९७. | ९ सप्टेंबर १९ | सोलापूर |
| ९८. | ९ सप्टेंबर १९ | पंढरपूर |
| ९९. | ९ सप्टेंबर १९ | माढा |
| १००. | ११ सप्टेंबर १९ | भाईंदर |

# महिला बचत गटांनी दर्जेदार काम करावे

## नागपूरच्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सल्ला




**नागपूर :** महिलांनी दर्जेदार काम केले पाहिजे. उत्पादनांच्या दर्जांमध्ये तडजोड केली तर सक्षमीकरण होणार नाही, असा सल्ला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी येथे दिला. प्रज्ज्वला योजनेच्या प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.

बचत गटांच्या महिलांच्या प्रशिक्षणासाठी आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर राज्याचे अर्थमंत्री श्री सुधीर मुनगंटीवार, उर्जा मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री परिणय फुके, महापौर नंदा जिचकार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

आपल्या भाषणात गडकरी जी यांनी आयोगाच्या या उपक्रमांचे विशेष कौतुक केले आणि आयोगाला आवश्यक असणारे सर्व सहकार्य करण्याची ग्वाहीही दिली. महिलांनी दर्जेदार काम केले पाहिजे. उत्पादनांच्या दर्जांमध्ये तडजोड केली तर सक्षमीकरण होणार नाही, असा मंत्री त्यांनी महिलांना दिला. आपल्या भाषणामध्ये अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी महिलांना सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती दिली. मातृशक्तीच्या आशीर्वादाने राज्याचा चेहरामोहरा बदलल्याशिवाय राहणार नाही, असे मुनगंटीवार म्हणाले.

केंद्र आणि राज्य सरकारकडून महिलांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. महिलांना सक्षम करणे हे सरकारचे कार्य आहे.




महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही अनेक कायदे आहेत. शासनाच्या या योजना आणि कायदे यांचा योग्य अभ्यास करून सरकारच्या योजनांचा योग्य लाभ घेऊन आत्मनिर्भर व्हा, असे आवाहन आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. प्रज्ज्वला योजनेची तपशीलवार माहितीही त्यांनी दिली.

# ‘प्रज्ज्वला’च्या माध्यमातून महिलांना रोजगार

## नागपूरच्या कार्यक्रमात अध्यक्ष विजया रहाटकर यांचे प्रतिपादन

**नागपूर :** प्रज्वला योजनेतंर्गत पहिल्या टप्प्यात बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात येत असून दुसऱ्या टप्प्यात ‘एक जिल्हा, एक वस्तू’ असे क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी येथे केले. महिला बचत गटांसाठी राज्य महिला आयोगातर्फे प्रज्वला योजना प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना राहटकर बोलत होत्या.

कामठी येथील पंकज सभागृहात आयोजित कार्यक्रमात आयोगाच्या माजी सदस्य नीता ठाकरे, माजी महापौर श्रीमती अर्चना डेहनकर, प्रज्वला योजना प्रशिक्षक श्रीमती दिपाली मोकाशी, गटविकास अधिकारी सचिन सूर्यवंशी, महिला आयोगाच्या श्रीमती कपालिनी सिनकर आदी मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, महिला बचत गटांची आर्थिक, सामाजिक व कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून प्रज्वला योजना राबवण्यात येत आहे. महिलांना स्वतःची प्रतिमा निर्माण करायची आहे. महिलांना मदत करणे, कौटुंबिक वाद निपटणे यापुरतेच महिला आयोगाचे काम मर्यादित नाही. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, महिलांना अर्थसंपन्न होता यावे यासाठी प्रज्वला योजना अत्यंत महत्वाची असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

राज्यामध्ये सुमारे ३ लाख बचत गट असून त्यांच्याशी सुमारे साठ लाख महिला जोडलेल्या आहेत. हे बचत गट आर्थिक सक्षमीकरणाचा कणा असल्याने आयोगाने बचत गटांना आणखी सक्षम करण्यावर भर दिला आहे. प्रज्वला योजनेतंर्गत पहिल्या टप्प्यात बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात येत असून दुसऱ्या टप्प्यात ‘एक जिल्हा, एक वस्तू’ असे क्लस्टर्स तयार करण्यात येणार आहेत. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. तिसऱ्या टप्प्यात बचत गटांच्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ मिळण्यासाठी ‘बचत गट बाजार’ जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्यात येणार असल्याची माहिती आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी दिली. या योजनेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि महिला व बाल कल्याण मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचे सहकार्य लाभल्याचे श्रीमती विजया रहाटकर यांनी यावेळी सांगितले. आतापर्यंत प्रज्वला प्रशिक्षण कार्यक्रम नागपूरप्रमाणेच नंदुरबार, धुळे, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सांगली, अहमदनगर, नांदेड, परभणी, जळगाव, अकोला, वाशीम, पालघर, भंडारा, गोंदिया, अकोला, अमरावती, लातुर, सोलापूर, बीड, मुंबई, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यात झाले आहेत.

यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनी राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या महिलांसाठी असलेल्या




विविध योजना उपस्थित महिलांना समजून सांगितल्या. तसेच महिलांच्या संरक्षणासाठी तसेच विकासासाठी राज्य शासन तसेच केंद्र शासनाने तयार केलेल्या कायद्याविषयी सखोल माहिती दिली. या कार्यक्रमात प्रत्येक महिलांना एक कीट देण्यात आली. त्यामध्ये योजना तसेच कायदे याविषयी माहिती देणाऱ्या पुस्तिकांचा समावेश होता. त्या पुस्तिकांचा महिलांनी जाणीवपूर्वक अभ्यास करावा, तसेच कुठेही महिलांवर अत्याचार झाला तरी राज्य महिला आयोग प्रत्येक महिलेच्या पाठीशी उभे असून पीडित महिलेने भीती मुक्त होऊन स्थानिक यंत्रणेकडे दाद मागण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच वित्त, नियोजन, विशेष सहाय्य, वनेमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा संदेश उपस्थित महिलांना दाखविण्यात आला. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

काय आहे प्रज्वला योजना?

राज्यामध्ये सुमारे ५ लाख बचत गट कार्यरत असून त्यांच्याशी सुमारे १कोटी १० लाख महिला जोडलेल्या आहेत. बचत गट आर्थिक सक्षमीकरणाच्या कणा असल्याने आयोगाने बचत गटांना आणखी सक्षम करण्यावर भर दिला आहे. त्यातून प्रज्वला योजना आकारास आली आहे. प्रज्वला योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात महिला बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात एक जिल्हा एक वस्तू अशी क्लस्टर तयार करण्यात येणार आहे. त्यातून प्रत्येक जिल्ह्याला एक ओळख आणि महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. तिसऱ्या टप्प्यात बचत गटांच्या उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ मिळवण्यासाठी बचत गट बाजार, जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्याचे नियोजन आहे, अशा पद्धतीने प्रज्वला योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## बल्लारपूर (जि. चंद्रपूर)

**अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे गाव असलेल्या बल्लारपूरच्या प्रशिक्षणाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा उत्साहवर्धक प्रतिसाद. योजनांची माहिती या महिलांना आहेच. या माहितीत भर टाकली ती आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्या भाषणाने.**








## जि. चंद्रपूर

**'प्रज्ज्वला' योजनेसाठी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे सहकार्य लाखमोलाचे आहे. बचत गट सक्षम व्हावेत व महिलांच्या हातांना काम मिळावे,असा मुनगंटीवार यांचा हेतू आहे, अशा शब्दांत विजया रहाटकर यांनी अर्थमंत्र्याचे आभार मानले.**





# पुण्यातील प्रशिक्षणाला अलोट प्रतिसाद





**पुणे :** तुडुंब प्रतिसाद म्हणजे काय, हे समजून घ्यायचे असेल तर पुण्यातील गणेश कला क्रीडाच्या भव्य सभागृहात झालेल्या प्रशिक्षणाचे उदाहरण पाहावे लागेल. सभागृहात तर पाऊल ठेवायला जागा नव्हती, तेव्हा मग बचत गटांच्या महिलांनी चक्क व्यासपीठावरच बैठक मांडली.पुण्यातील प्रशिक्षणाला मुख्य मार्गदर्शन केले ते आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी. त्याचबरोबर प्रामुख्याने उपस्थित होते खासदार गिरीश बापट, आमदार माधुरी मिसाळ आणि महापौर मुक्ता टिळक. याशिवाय समित्यांचे प्रमुख, नगरसेवक, वरिष्ठ अधिकारीदेखील बचत गटांच्या महिलांच्या या प्रशिक्षणाला उपस्थित होते. 'बचत गट म्हणजे महिला सक्षमीकरणाची निद्रीस्त ताकत आहे. तिच्या क्षमतांना साद घातली तर विकासाचा रथ वेगाने दौडल्याशिवाय राहणार नाही. म्हणून तर केंद्र, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाच्या योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना बळकट करण्याचा हेतू या प्रशिक्षणामागे आहे', असे प्रतिपादन आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले.

> **"महिलांच्या क्षमतांना साद घातल्यास विकासाचा रथ वेगाने दौडल्याशिवाय राहणार नाही, त्यामुळेच विकास योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहचवून त्यांचे सक्षमीकरण करण्याचा हेतू या प्रशिक्षणाच्या आयोजनामागे आहे.**
> **- विजया रहाटकर,**
> अध्यक्ष, राज्य महिला आयोग

## परळी (जि. बीड)

महिला फक्त कुटुंबांचा कणा नाहीत; तर विकासाच्या वाहक आहेत. त्यांच्या सक्षमीकरणाचे ध्येय आहे. 'अस्मिता', 'माझी कन्या भाग्यश्री' योजना त्याच ध्येयातून साकारल्या आहेत. बचत गटांसाठीही पावले उचलली आहेत, असे मत महिला आणि बाल विकासमंत्री पंकजा मुंडे यांनी परळी (जि. बीड) येथील प्रशिक्षण कार्यक्रमात व्यक्त केली. यावेळी खा. प्रीतम मुंडे याही उपस्थित होत्या.

> " स्त्रियांमध्ये बचतीचा गुण असतो,हे ओळखून आम्ही बचतगटांची चळवळ गतीमान केली, त्यासाठी योजना अंमलात आणल्या. बचतगटांच्या महिलांना व्यवसायासाठी शुन्य टक्के दराने कर्ज दिले,ज्यामुळे ती ताकदीने उभी राहिलीय.
>
> – **पंकजा मुंडे,** महिला व बाल विकास मंत्री





## पंढरपूर (जि. सोलापूर)

बचत गटाच्या महिला म्हणजे आर्थिक शिस्तीची खात्री. त्यांनी बँकांच्या कर्जाची शंभर टक्के परतफेड केलीय. महिलांच्या सचोटीबद्दल विश्वास असल्याने या गटांना एक लाख रुपयांपर्यंतची ओव्हरड्राफ्ट सुविधा सरकारने उपलब्ध करून दिली आहे, असा विश्वास राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकार यांनी ९ सप्टेंबरला पंढरपूर येथील प्रशिक्षणावेळी व्यक्त केला. सोलापूर जिल्ह्यात माळशिरस, सोलापूर शहर येथेही महिला बचत गटांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.





## मीरा भाईंदर

महिला बचत गटांसाठी माविम, उमेद आदी संस्था अतिशय उत्तम काम करीत आहेत. त्यांच्या मदतीसाठी राज्य महिला आयोगाने प्रज्ज्वला प्रशिक्षण आखली होती. राज्य सरकारने त्यासाठी पाच कोटी रुपयांची तरतूदही केली आहे. मला आनंद आहे, की आज प्रज्वलाचा समारोप होत आहे. सुमारे १५० विधानसभांचा समावेश असलेले तब्बल १०० प्रशिक्षण कार्यक्रम आयोगाने केले आहेत. चांद्यापासून बांद्यापर्यंत, गडचिरोलीपासून जव्हारपर्यंत, नंदूरबारपासून पाथरीपर्यंत उभा महाराष्ट्र आयोगाने पालथा घातला. या प्रशिक्षणामध्ये सुमारे तीन लाख महिलांशी संपर्क साधला. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. त्यांना शासकीय योजनांची आणि महत्त्वपूर्ण कायद्यांची समजावून सांगितली. त्यांना सक्षम करण्याच्या प्रयत्नांना हातभार लावला, अशी माहिती आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी मीरा भाईंदरमध्ये दिली.








# महिला पॅन कार्ड धारकांच्या संख्येत वाढ

**नवी दिल्ली :** प्राप्तिकर विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, विभागाच्या वतीने २०१९मध्ये ४३.५२ कोटी पॅन कार्ड वितरित करण्यात आली आहेत. त्यातील जेमतेम एक तृतीयांश महिलांची आहेत. याचा अर्थ महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अजून म्हणावे तितके झालेले नाही. देशातील आर्थिक घडामोडी आणि व्यवहारांमध्ये महिलांचा सहभाग फारच कमी असल्याचे ते निदर्शक आहे. मात्र, आर्थिक घडामोडींतील स्त्री आणि पुरुष यांच्यातील ही दरी कमी होत आहे, ही त्यातल्या त्यात दिलासादायक बाब आहे.

आर्थिक वर्ष २०१७ ते २०१९ या काळात महिला पॅनकार्डधारकांची संख्या ३१.९२ टक्क्यांवरून ३७.१६ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. त्या उलट पुरुषांची संख्या ६८.०८ टक्क्यांवरून ६२.८४ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. करपात्र उत्पन्न असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे पॅन कार्ड असणे बंधनकारक आहे. ही बाब लक्षात घेता महिला पॅनधारकाची संख्य वाढणे, याचा नेमका अर्थ लक्षात येतो.

### बदलांमागील कारणे

महिला आणि मुलांच्या शिक्षणासाठी सरकारी पातळीवरून केल्या जात असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे महिलांचा आर्थिक क्षेत्रातील सहभाग वाढतो आहे. आपल्या कार्यक्षम मनुष्यबळात अधिकाधिक महिलांनाही सामावून घेण्याची मानसिकता समाजात तयार झाली आहे.


### महिलांकडून पॅन कार्ड काढण्याचे प्रमाण का वाढते आहे?

महिलांनी पॅन कार्ड काढण्याचे प्रमाण वाढण्यामागील सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे प्राप्तिकर भरण्यासाठी, असे आर्थिक विषयातील जाणकारांचे मत आहे. काही राज्यांमध्ये महिलांचे नाव मिळकतीवर चढविल्यास मुद्रांक शुल्कात सवलत दिली जाते. हा लाभ घेण्यासाठी आधी पॅन कार्ड असणे अनिवार्य आहे. या सर्व कारणांमुळे महिलांकडून आर्थिक व्यवहार केले जाण्याचे प्रमाण वाढते आहे. अर्थात, अजून बराच पल्ला गाठायचा आहे. ग्रामीण भागात करण्यात आलेल्या नियतकालीन श्रमशक्ती पाहणीनुसार (पीरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हे) श्रमिक वर्गात महिलांचे प्रमाण फक्त १७.५५ टक्के असून, पुरुषांचे ५५.९५ टक्के आहे.

### लिंगभेद दूर करण्याबाबत राज्यांची स्थिती

केरळ आणि सिक्कीम या राज्यांत स्त्री-पुरुष भेद सर्वांत कमी प्रमाणात असल्याचे आढळते. अंदमान आणि निकोबार बेटे आणि चंडीगड या केंद्रशासित प्रदेशांतही लिंगसमानतेच्या दृष्टीने सुधारणा झाल्याचे आढळते. मात्र, बिहार, मणिपूर, उत्तर प्रदेश, गुजरात, हरियाणा आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये महिलांबाबत भेदभाव मोठ्या प्रमाणावर केला जातो, असे निती आयोगाकडील माहितीवरून दिसते.

**(सौजन्य : लाइव्ह मिंट)**



# सुवर्ण सिंधू





**भारताची अव्वल बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिने जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत भारतीय बॅडमिंटनमध्ये नवा इतिहास घडविला. अशी कामगिरी करणारी सिंधू देशाची पहिलीच खेळाडू ठरली. वर्षात सर्वाधिक कमाई करणाऱ्या खेळाडूंमध्ये सिंधूचादेखील समावेश झाल्याने तिने खरेतर दुहेरी यशाचा आलेख उंचावला आहे.**

अमित मधुकर डोंगरे, amitdongre10@gmail.com

भारतीय बॅडमिंटनला मोठा इतिहास आहे, याचे साक्षीदारदेखील आज पुसरला व्यंकट तथा पी. व्ही. सिंधूच्या रूपाने देशाला एक महान खेळाडू गवसल्याचे मान्य करत आहेत, हेच सिंधूचे यश आहे. जपानची माजी जगज्जेती नोझोमी ओकुहारा हिला सरळ दोन गेममध्ये २१-७ आणि २१-७ असे पराभूत करीत सिंधूने जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत विजेतेपद मिळविले. गेल्या दोन वर्षांपासूनचे अपयश सिंधूने यंदा धुवून काढले. गेली दोन वर्षे सिंधूला या स्पर्धेत रौप्य पदकावर समाधान मानावे लागले होते. मात्र, यदा तिने ओकुहाराला पूर्णपणे नामोहरम करत अजिंक्यपद पटकावले. २०१७ व २०१८ अशी सलग दोन वर्षे सिंधूला ओकुहाराविरोधातच अपयश येत होते. या सामन्यातील पहिलाच शॉट तब्बल २२ रॅलीजचा झाला. पहिल्या गेममध्ये सिंधूने सलग आठ गुणांची कमाई केली तसेच ही आघाडी १६-२ अशी वाढविली. दुसऱ्या गेममध्ये देखील सिंधूने ९-२ असे वर्चस्व मिळविले होते. ओकुहाराने केलेला प्रतिकार सिंधूने लीलया मोडून काढला व सुवर्णपदकावर नाव कोरले.

चीनच्या झँग निंगच्या पाच जागतिक पदकांच्या विक्रमाशीदेखील सिंधूने बरोबरी केली. इतकेच नाही तर सिंधूने महिला एकेरीतील सगळी पदके प्राप्त करण्याचादेखील पराक्रम केला आहे. तिच्याकडे आता एक सुवर्ण आणि रौप्य व ब्रॉंझ अशी प्रत्येकी दोन पदके जमा आहेत. २४ वर्षांच्या सिंधूने फुलराणी साईना नेहवाललाही मागे टाकत आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. सिंधुच्या आधी प्रकाश पदुकोन, बी. साई प्रणीत आणि साईना नेहवाल यांनीही या स्पर्धेत पदके जिंकण्याची कामगिरी केलेली आहे. जागतिक स्पर्धेत भारताच्या नावावर एकूण दहा पदके जमा आहेत. प्रकाश पदुकोन यांनी १९८३ साली आणि साई प्रणीतने यंदा पदके मिळविली आहेत. महिला गटात ज्वाला गुट्टा व अश्विनी पोनाप्पा जोडीने महिला दुहेरीत ब्रॉंझ पदक पटकावले होते. साईना नेहवालने २०१५ साली रौप्य तर २०१७ साली ब्रॉंझ पदकाची कमाई केली आहे. सिंधूने यंदाच्या विजयासह ओकुहारावर नववा विजय नोंदविला. या दोन खेळाडूंमध्ये एकूण सोळा वेळा सामना झाला त्यात सिंधूने नऊ तर ओकुहाराने सात विजय मिळविले आहेत. जागतिक स्पर्धेत सिंधू आणि ओकुहारा यांच्यात झालेल्या तीन सामन्यांमध्ये सिंधूने दोनदा विजयाची नोंद केली आहे. गेल्या चार दशकांपासून असलेली जागतिक पदकाची अपेक्षा यावेळी सिंधूने पूर्ण केली व ती देशाची नवी सुवर्णकन्या बनली.

सिंधूला २०१३ साली अर्जुन पुरस्काराने तर २०१५ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. २०१६ मध्ये तिला सर्वात प्रतिष्ठेचा राजीव गांधी खेलरत्न पुरस्कारदेखील मिळाला. २०१६च्या ब्राझील ऑलिंपिकमध्ये सिंधूला स्पेनच्या कॅरोलिन मरिनकडून पराभवाचा सामना करावा लागल्याने रौप्य पदकावरच समाधान मानावे लागले होते. मात्र त्यावेळी अशी कामगिरी करणारी सिंधू देशाची पहिलीच बॅडमिंटनपटू ठरली होती, तिच्या याच कामगिरीचा खेलरत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला. सिंधूने जागतिक स्पर्धेत पाच, राष्ट्रकुल स्पर्धेत दोन, आशियाई स्पर्धेत एक पदक मिळविले आहे.



# वारसा कुटुंबातून

हैदराबादमध्ये जन्मलेल्या सिंधूने डॉक्टर व्हावे अशी तिच्या पालकांची अपेक्षा होती, मात्र तिला बॅडमिंटनपटूच व्हायचे होते. तिचे वडील रामण्णा व आई विजया हे व्हॉलिबॉल खेळाडू होते, त्यामुळे घरात क्रीडा संस्कृती असल्याचा सिंधूला सातत्याने लाभच झाला. रामण्णा यांच्या संघाने १९९६ साली सोल आशियाई स्पर्धेत ब्राँझ पदक मिळविले होते. या विजयात रामण्णा यांच्या कामगिरीचा खूप मोठा वाटा होता. त्यांच्या याच कामगिरीमुळे त्यांना २००० साली अर्जुन पुरस्कारही मिळाला होता. तिची बहीण आज एक यशस्वी डॉक्टर असली तरी एक यशस्वी हँडबॉल खेळाडूदेखील होती. २००१ साली भारताचा अव्वल खेळाडू पी. गोपीचंद याने ऑल इंग्लंड स्पर्धा जिंकली तेव्हा त्याचाच खेळ पाहून सिंधूने बॅडमिंटनमध्येच कारकीर्द करण्याचा निर्णय घेतला. गोपीचंद यांचा परिसस्पर्श लाभला आणि सिंधूच्या रूपाने देशाला नवी सुवर्णकन्या लाभली. वयाच्या आठव्या वर्षीच तिने या खेळाचे धडे गिरविण्यास सुरुवात केली. सिकंदराबाद येथील रेल्वेच्या कोर्टवर तिची या खेळातील मक्तेदारी निर्माण व्हायला सुरुवात झाली. तिने या काळात मेहबूब अली या राष्ट्रीय खेळाडूकडून मार्गदर्शन घेतले. तिने जेव्हा राष्ट्रीय पातळीवर यश मिळविण्यास सुरुवात केली तेव्हा ती गोपीचंद यांच्याच अकादमीत दाखल झाली. तिच्या खेळातील बलस्थाने तसेच कमकुवत दुवे याबाबत गोपीचंद यांनी खूप मेहनत घेत सिंधूला एक आंतरराष्ट्रीय खेळाडू बनविण्यात मोठे योगदान दिले. २०१६ साली जेव्हा तिने ऑलिंपिक पदक जिंकले तेव्हापासून तिच्याकडे प्रायोजकांचा ओढा वाढला. ती देश पातळीवर एक ब्रँड बनली. ब्रँड बनून विविध जाहिरातींतून उत्पन्न मिळविणारी सिंधू क्रिकेटपटू विराट कोहली याच्याप्रमाणेच सर्वाधिक जाहिराती करणारी खेळाडू बनली. सिंधूने आजवर ४१६ सामने खेळले असून, त्यापैकी २९६ सामने जिंकले आहेत. भारत पेट्रोलियमने सिंधूला आपल्या सेवेत सामावून घेतले आहे. इतकेच नव्हे तर आंध्र प्रदेश सरकारने तिला उपजिल्हाधिकारी पददेखील बहाल केले. सिंधूने ३१ ऑगस्टला ही कामगिरी केली. त्याच दिवशी तिच्या आईचा वाढदिवस होता. त्यामुळे एका अर्थी तिने आईला खूपच मोठी भेट दिली. यंदाच्या मोसमात सिंधूने खेळलेल्या २८ आंतरराष्ट्रीय सामन्यांत १९ विजय तर ९ पराभव अशी सरस कामगिरी केली आहे. खरेतर यावेळी देखील तिच्या तंदुरुस्तीबाबत प्रश्न विचारले जात होते, मात्र सिंधूने या कोणत्याही गोष्टीचे दडपण न घेता खेळ केला व अवघ्या बॅडमिंटन चाहत्यांच्या अपेक्षा पूर्ण केल्या.

भूतकाळावर जर नजर टाकली तर चीन, इंडोनेशिया, कोरीया आणी जपान या देशांची आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनवर सातत्याने मक्तेदारी राहिलेली दिसते, मात्र आधी साईनाने तर आता सिंधूने ही मक्तेदारी मोडून काढली व भारताचा दबदबा निर्माण केला. भारताचे ऑल इंग्लंड विजेते खेळाडू व प्रशिक्षक पुलेला गोपीचंद यांच्याकडे सराव करायला लागल्यापासून सिंधूच्या खेळात कमालीची सुधारणा झाली. साईना प्रमाणेच तिने आपल्या खेळाला नवी उंची दिली. साईनापाठोपाठ सिंधूने देखील ऑलिंपिक पदक जिंकल्यापासून या खेळाला क्रिकेटप्रमाणेच एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झाली. पी. व्ही. म्हणजेच पुसरला व्यंकट सिंधू हीने सलग पाच वर्षे जागतिक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात खेळण्याची केलेली कामगिरी अन्य कोणालाही जमलेली नाही. गेल्या मोसमात सिंधूचा खेळ तितकाचा चांगला होत नव्हता, त्यावेळी तिच्या अपयशाची देखील जोरदार चर्चा होती, पण फॉर्म इज टेंपररी बट क्लास इज पर्मनंट हेच गमक सिद्ध करत सिंधूने आपल्या खेळाने टीकाकारांची तोंडे बंद केली. जागतिक सुवर्णपदक हा तर सिंधूने घातलेला पाया असून, जपानमध्ये होत असलेल्या ऑलिंपिक स्पर्धेचे सुवर्णपदक तिच्या कारकिर्दीचा कळस ठरणार आहे.



## पंतप्रधानांकडून सिंधूचे कौतुक

जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत विजेतेपद मिळविल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिंधूचे अभिनंदन केले. “विलक्षण प्रतिभाशाली पी. व्ही. सिंधूने भारताची मान पुन्हा उंचावली आहे. बीड्ब्लूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत विजेती ठरल्याबद्दल तिचे अभिनंदन. ज्या जिद्दीने आणि समर्पित वृत्तीने तिने हे अजिंक्यपद मिळविले, ते प्रेरणादायी आहे. सिंधूचे हे यश पुढील पिढीतील बॅडमिंटनपटूंसाठी प्रेरक ठरेल.”



# सनसनाटी सिंधू

**जन्म :** ५ जुलै १९९५

**आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनमध्ये पदार्पण :** २००९

**जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांक :** २०१७

**जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत विजेती :** २०१९

**पदके :** राष्ट्रकुल, आशियाई, जागतिक बॅडमिंटन, उबर करंडक

**ऑलिंपिकमधील कामगिरी :** रौप्य पदक (ब्राझील)

**सध्याचे जगतिक क्रमवारीतील स्थान :** ५

**खेळलेले एकूण सामने :** ४४१

**जिंकलेले सामने :** ३१२

**विजेतीपदे :** १५

**राष्ट्रीय पुरस्कार :** अर्जुन, राजीव गांधी खेलरत्न

**नागरी सन्मान :** पद्मश्री

ओळख कायद्याची

# ओळख फौजदारी कायद्यांची




**महिलांविषयक कौटुंबिक कायदे विषयक जनजागृतीसाठी राज्य महिला आयोगाने 'विधिलिखित' ही पुस्तक मालिका प्रकाशित केली आहे. त्या मालिकेतील फौजदारी कायद्यांची माहिती...**

## बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६

एका आंतरराष्ट्रीय पाहणीनुसार, जगभरात तब्बल ४७ टक्के मुलींचे विवाह वयाच्या १८ वर्षांच्या आत होतात. भारतात मुलीच्या विवाहाचे वय १८ निश्चित करण्यात आले आहे, हे आपल्याला माहिती आहेच. मात्र, भारतात मोठ्या प्रमाणात बालविवाह केले जातात. याबाबत जगात भारताचा १३ वा क्रमांक लागतो. भारतीय पुरुषप्रधान संस्कृती आणि जुन्या रुढी-परंपरांचा पगडा यामुळे भारतात, विशेषतः ग्रामीण भागात आजही मुलगी वयात आली, की तिचे लग्न लावून दिले जाते. लहान वयात लग्न केल्यामुळे त्या मुलीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. भारतात मोठ्या प्रमाणावर मुलींचे बालविवाह केले जात असल्यामुळे ते रोखणे अवघड आहे. त्यासाठी २००६ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्यात आला. हा कायदा २००७ मध्ये अमलात आला. या कायद्यानुसार, मुलीचे वय १८ पूर्ण आणि मुलाचे वय २१ पूर्ण नसेल, तर तो कायद्याने गुन्हा मानला गेला आहे. अशा विवाहास बालविवाह मानले जाते आणि तो बेकायदेशीर ठरतो. मुलीचे वय १८ पूर्ण आणि मुलाचे वय २१ पूर्ण नसताना त्यांचा विवाह केल्यास त्यांचे कायदेशीर पालक शिक्षेला पात्र ठरतात.

भारतात बालविवाह प्रतिबंधक कायदा एक नोव्हेंबर २००७ रोजी अस्तित्वात आला. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर २००७ मध्ये एक ऐतिहासिक निवाडा दिला. त्यानुसार अल्पवयीन पत्नीशी शरीरसंबंध हा गुन्हा ठरविण्यात आला. तोपर्यंत पुरुषांना लग्नबंधनामुळे अल्पवयीन वधूशीही शरीरसंबंध ठेवता येणे हा गुन्हा नव्हता.

### कायद्याचे स्वरूप

या कायद्याचे २१ विभाग आहेत. जम्मू-काश्मीर वगळता आणि केंद्रशासित प्रदेश पाँडिचेरीतील फ्रेंच नागरिकत्व असलेले लोक वगळता तो सर्वत्र लागू आहे.

दुसऱ्या विभागात काही व्याख्या दिल्या आहेत. त्या अशा :

**बाल :** २१ वर्षे पूर्ण न केलेला पुरुष व १८ वर्षे पूर्ण न केलेली स्त्री.

**विवाहेच्छू कुटुंब :** लग्न ज्याचे किंवा जिचे आहे, त्याचे किंवा तिचे अशी दोन्ही कुटुंबे.

**बालविवाह :** वर व वधू यापैकी कुणीही बाल असेल, तर तो बालविवाह.

**अल्पवयीन :** सज्ञान कायद्यान्वये जो सज्ञान नाही, अशी कुठलीही व्यक्ती.

**विवाहविच्छेद (कलम ३) :** प्रत्येक बालविवाह विवाहेच्छू कुटुंबांच्या मर्जीने रद्द करता येतो. सज्ञान झाल्यानंतर दोन वर्षांच्या आत वर किंवा वधू जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करून विवाहविच्छेद करू शकतात. यासंबंधात जिल्हा न्यायाधीश संबंधित कुटुंबांना विवाहाचा खर्च, पैसे, दागिने, भेटवस्तू व इतर किमती वस्तू दुसऱ्या कुटुंबास परत देण्याचा आदेश देऊ शकतात.

**पोटगी व निवास तरतूद :** बालविवाह रद्द करताना जिल्हा न्यायाधीश वधू पक्षाला पोटगीरूपी भरपाई देण्याचा आदेश वर पक्षाला देऊ शकतात. बालविवाहातील पुरुषही अल्पवयीन असेल, तर त्याच्या पालकांना ही भरपाई द्यावी लागेल. वधूचा दुसरा विवाह होईपर्यंत तिला ही भरपाई घेता येते. ही भरपाई एकदा किंवा दरमहा देता येते. याचसोबत वधूच्या राहण्याची व्यवस्था करण्याबाबतचा आदेशही न्यायालय देऊ शकते. वधूची सांपत्तिक स्थिती बघून न्यायालय हा आदेश देऊ शकते.

## शिक्षेची तरतूद

**१. सज्ञान पुरुष :** बालविवाह करणारा पुरुष १८ वर्षांहून अधिक वयाचा असेल, तर त्याला दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते. किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**२. लग्न लावल्याबद्दल शिक्षा :** बालविवाह लावणारा, ठरवणारा, पार पाडणारा, सूचना देणारा अशा कुठल्याही पद्धतीने या विवाहाला प्रोत्साहन देणारा माणूस शिक्षेस पात्र आहे. अशा व्यक्तीला दोन वर्षे सक्तमजुरीची किंवा एक लाख रुपये दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.




**३. बालविवाहास प्रोत्साहन, परवानगी दिल्याबद्दल शिक्षा :** बालविवाहास परवानगी देणारे माता-पिता, अन्य पालक किंवा अशी एखादी संस्था, कळत-नकळतपणे या विवाहाला मान्यता देणारे, या विवाहास उपस्थित राहणारे अशा कुणालाही, दोषी आढळल्यास दोन वर्षे सक्तमजुरी किंवा एक लाखापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

# हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१

भारतीय विवाहसंस्थेला कर्करोगासारखी ग्रासणारी एक वाईट पद्धत म्हणजे हुंडा. लग्न करून सासरी येणाऱ्या मुलीकडून हुंडा घेण्याची वाईट प्रथा भारतात अनेक शतके सुरू आहे. हा हुंडा रोख पैसे, दागिने, जवाहिरे, स्थावर वा जंगम मालमत्ता, पशुधन अशा कुठल्याही स्वरूपात मागितला जातो. ठरलेला हुंडा न दिल्यास विवाहितेचा सासरी छळ केला जातो. तिला मारहाण केली जाते, पशुवत वागविले जाते, प्रसंगी तिला जाळून मारण्यात येते. अशा या क्रूर प्रथेचा नायनाट व्हावा म्हणून भारतात १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. स्त्रीचे पुरुषांवरील अवलंबित्व कमी व्हावे आणि तिला स्वतंत्रपणे, मानाने जगता यावे यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. या कायद्यान्वये मुलीकडे कुठल्याही स्वरूपात हुंडा मागणे हा गुन्हा ठरतो.

हा कायदा २० मे १९६१ रोजी भारतात अस्तित्वात आला. जम्मू-काश्मीर राज्य वगळता तो सर्व देशात लागू आहे.




## हुंडा या शब्दाची व्याख्या

लग्न करताना दोन्ही बाजूंपैकी कोणत्याही बाजूने दुसऱ्या बाजूला देऊ केलेले पैसे, संपत्ती किंवा अन्य कुठल्याही प्रकारची स्थावर व जंगम मालमत्ता.

अ) एका बाजूने दुसऱ्या बाजूस देऊ केलेली, किंवा

आ) वर व वधू या दोन्ही बाजूंपैकी एका बाजूच्या पालकांनी दुसऱ्या बाजूस देऊन केलेली किंवा आश्वासित केलेली, लग्न होण्याआधी दिलेली किंवा लग्न झाल्यावर देणार असलेली कुठलीही संपत्ती, रोख पैसे, मालमत्ता. (मुस्लिम शरिया कायद्यात येणारे 'मेहेर' अपवाद)

शिक्षेची तरतूद : हुंडा प्रकरणी दोषी ठरल्यास पाच वर्षे कारावासाची शिक्षा देण्याची तरतूद आहे. याशिवाय १५ हजार रुपये दंड आणि/किंवा हुंडा म्हणून दिलेली रक्कम यापैकी जी जास्त असेल ती.

# वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१



हा कायदा प्रथम १९७२ मध्ये भारतात अमलात आला. त्यात १९७५ व २००२ मध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या. बेकायदेशीरपणे होणारे गर्भपात रोखणे आणि सोबत होणारे मातामृत्यू व बालमृत्यू रोखणे हा या कायद्याचा हेतू आहे. कुठल्या परिस्थितीत असा गर्भपात करता येईल, याची मार्गदर्शक तत्त्वे या कायद्यात नमूद केली आहेत. असा गर्भपात करण्यात कोणती महिला पात्र असेल याचीही मार्गदर्शक सूची या कायद्यात देण्यात आली आहे.

## पार्श्वभूमी

वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ मध्ये लागू करण्यात आला. त्यात सन २००२ मध्ये सुधारणा करण्यात आली. देशामध्ये सुरक्षित व कायदेशीर गर्भपात सेवा पुरविण्यासाठी आराखडा बनविण्यात आला.

## वैद्यकीय गर्भपात कायद्याची ठळक वैशिष्ट्ये

वैद्यकीय गर्भपात कायद्याकरिता गर्भावस्था मर्यादा

भारतामध्ये कायदेशीर गर्भपातास २० आठवड्यांपर्यंत मान्यता

## वैद्यकीय गर्भपात कायदा

वैद्यकीय गर्भपात कायदयानुसार डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार खालील कारणांमुळे वैद्यकीय गर्भपात (मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी - एमटीपी) करता येतो.

गर्भवती मातेच्या जीवाला धोका असल्यास किंवा गर्भवती मातेला मानसिक किंवा शारीरिक आरोग्यास गंभीर इजा, दुखापत होत असल्यास.

नवजात बालकास जन्मानंतर मानसिक किंवा शारीरिक व्यंग असल्यास त्यामुळे बालकास अपंगत्व येणार असेल तर.

महिलेला/कुमारीकेला बलात्कारामुळे गर्भधारणा झाली असेल, तर गर्भपात करता येतो (महिलेच्या मानसिक आरोग्याला जबर धक्का बसल्याचे गृहीत धरून)

विवाहित महिलेकडून किंवा तिच्या पतीकडून गर्भनिरोधक साहित्याच्या/औषधाच्या निष्क्रियतेमुळे गर्भधारणा झाल्यास.

वैद्यकीय गर्भपात कायद्यानुसार २० आठवड्यांपर्यंत स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ गर्भपात करू शकतात. इंडियन मेडिकल कौन्सिल कायदा, १९५६ यात सांगितल्याप्रमाणे, नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक, ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त संस्थेची वैद्यकीय पदवी (अर्हता) धारण केलेली असावी. ज्यांचे नाव स्टेट मेडिकल रजिस्टरमध्ये समाविष्ट आहे आणि ज्यांना स्त्रीरोग या विषयात काम करण्याचा अनुभव आहे किंवा प्रशिक्षण पूर्ण केले आहे, असे प्रशिक्षित डॉक्टर गर्भपात करण्यासाठी पात्र समजले जातात.

स्त्रीरोग आणि प्रसूतिशास्त्र या विषयात काम करण्याचा सहा महिन्यांचा अनुभव.

सर्व सुविधा असलेल्या शासकीय दवाखान्यात एक वर्ष काम करण्याचा अनुभव.

एमबीबीएस डॉक्टर १२ आठवड्यांपर्यंत गर्भपात करू शकतात. इंडियन मेडिकल कौन्सिल कायदा १९५६ या कायद्यात सांगितल्याप्रमाणे असा नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक, ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त संस्थेची वैद्यकीय पदवी (अर्हता) धारण केलेली असावी व ज्यांचे नाव स्टेट मेडिकल रजिस्टरमध्ये समाविष्ट आहे आणि केंद्र सरकारच्याच्या अटींनुसार यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.

(एमटीपी कायद्यानुसार एएनएमएस, स्टाफ नर्स, प्रशिक्षित दाई किंवा इतर अप्रशिक्षित व्यक्तींना गर्भपात करण्यात परवानगी नाही. असे असले तरी ते समुपदेशन, प्रसूतिपूर्व गर्भपाताची काळजी घेणे आणि तदनुसार गर्भपात करण्यास संदर्भ सेवा देण्याचे काम करु शकतात.)

वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ अंतर्गत शासन मान्यताप्राप्त असलेल्या गर्भपात केंद्रातच गर्भपात करता येतो. गर्भपाताच्या सुविधा असलेल्या शासकीय दवाखान्यामध्ये गर्भपात करता येतो, त्यासाठी वेगळी परवानगी घेण्याची गरज नाही.

किंवा एमटीपी सेंटरच्या जागेसाठी (नर्सिंग होम/खासगी दवाखाना/अशासकीय संस्था) यांना जिल्हास्तरीय समिती / जिल्हा शल्य चिकित्सकांची मान्यता, परवानगी घ्यावी लागते.

## कायद्याचे उल्लंघन केल्यास शिक्षेची तरतूद

वैद्यकीय गर्भपात कायदा करणारी कोणतीही व्यक्ती, ज्याची नोंदणी वैद्यकीय व्यावसायिक म्हणून नाही त्यास कमीत कमी दोन वर्षे आणि जास्तीत जास्त सात वर्षांपर्यंत सक्तमजुरीस होऊ शकते. गर्भपात करणारी कोणतीही व्यक्ती जिच्या जागेस मान्यता नाही, अशा व्यक्तीला कमीत कमी दोन वर्षे आणि जास्त सात वर्षापर्यंत सक्तमजुरी होऊ शकते.

मान्यता नसलेल्या जागेचा मालक, जेथे गर्भपात केला जातो, अशा व्यक्तीस कमीत कमी दोन वर्षे आणि जास्त सात वर्षांपर्यंत सक्तमजुरी होऊ शकते. (महिलेचा जीव वाचविण्यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडून गर्भपात केला असेल व जागेची मान्यता नसेल, नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाकडे आवश्यक असलेली गर्भपात करण्याकरिता कायदेशीर पूर्तता केली नसेल तर अशी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरत नाही.)

# गर्भधारणा पूर्व आणि जन्मपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा, १९९४

## कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये

- गर्भधारणेपूर्वी आणि नंतर लिंगचाचणीवर बंदी आहे.
- भ्रूण लिंगपरीक्षणासाठी (गर्भधारणापूर्व व प्रसूतिपूर्व चाचणी) तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगावर बंदी आहे.
- भ्रूण लिंग माहितीसाठी किंवा परीक्षणासाठी तंत्रज्ञान वापराच्या जाहिरातीवरही बंदी आहे. यामध्ये इंटरनेट माध्यमाचा समावेश आहे.
- भ्रूण लिंग चाचणी (गर्भधारणापूर्व किंवा प्रसूतिपूर्व चाचणी) करणाऱ्या केंद्रासाठी नोंदणी बंधनकारक आहे.
- 'फॉर्म-एफ'सह विहित नमुन्यात संबंधित माहिती संकलन आणि माहितीच्या रेकॉर्डचे संवर्धन बंधनकारक आहे.



## काही प्रकरणांमध्ये सशर्त अनुमती

काही विशिष्ट प्रकरणांमध्ये गर्भनिदानाला सशर्त अनुमती देण्यात आली आहे. त्यात प्रामुख्याने आनुवंशिक विकलांगपणाची शक्यता, लिंगविषयक रोग यांचा समावेश आहे. तसेच ज्या महिलेचे वय ३५ वर्षांहून अधिक आहे, जिचा दोनपेक्षा अधिक वेळा गर्भपात झाला आहे किंवा गर्भवती महिलेला रेडिएशन, संसर्ग अथवा रासायनिक बाधा झाली आहे, तर अशा प्रकरणांत संबंधित सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र असल्यास सशर्त गर्भनिदानास अनुमती देण्यात येते.

## ...तर केंद्रावर गुन्हा

गर्भजलचाचणी, आठ आठवड्यांचा गर्भ (५६ दिवस) व अर्भकाचा जन्म या तिन्ही स्तरांवर या कायद्याद्वारे लक्ष ठेवले जाते. सर्व सोनोग्राफी सेंटर, जेनेटिक कौन्सिलिंग सेंटर आणि लॅबोरेटरी या कायद्याच्या कक्षेत आणून त्यांना नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यांची देखरेख करणे व तपासणी करणे याचा त्यात समावेश आहे. या केंद्रांनी कायद्याचा भंग केला, तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे.

## अंमलबजावणी समित्या

या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेत विविध समित्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात केंद्रीय पर्यवेक्षक समिती असून, त्याच्याअंतर्गत राज्यस्तरीय पर्यवेक्षक समिती व राज्य समुचित प्राधिकारी, जिल्हा समुचित प्राधिकारी व तालुका समुचित प्राधिकारी हे टप्पे आहेत. केंद्रीय मूल्यमापन व तपासणी समितीच्या खालोखाल राज्य सल्लागार समिती, जिल्हा व तालुका सल्लागार समिती आहे. तसेच राज्य मूल्यमापन व तपासणी समिती आणि जिल्हा मूल्यमापन व तपासणी समिती नेमण्यात आली आहे.

## शिक्षा कोणाला?

या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रांवर व डॉक्टरांवर तसेच त्याची सेवा घेणाऱ्या कुटुंबांवरही गुन्हा दाखल होऊ शकतो.

गर्भवती महिलेची गर्भनिदान चाचणी करण्यासाठी सोनोलॉजिस्ट, अल्ट्रासॉनिक क्लिनिक अथवा लॅबोरेटरीचा वापर करणाऱ्या व्यक्तीला, स्त्रीरोगतज्ज्ञ किंवा डॉक्टरला पहिल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत शिक्षा आणि ५० हजार रुपये दंडाची तरतूद आहे.

'भारतीय पुरावा कायदा, १८७२'मधील तरतुदीचाही या ठिकाणी वापर केला आहे. या कायद्याच्या कलम २४नुसार महिलेला तिचा पती अथवा नातेवाइकांनी गर्भनिदान चाचणीसाठी सक्ती केल्याचे गृहीत धरण्यात आले आहे. त्यामुळे गर्भनिदान चाचणीसाठी प्रवृत्त करणाऱ्यांवरही फौजदारी खटला भरण्याची तरतूद आहे. कलम २५नुसार कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या अशा व्यक्तींवर तीन महिन्यांची शिक्षा व दंड ठोठावण्याची तरतूद आहे.

हा गुन्हा दखलपात्र, अजामीनपात्र व दंडात्मक आहे. अशा प्रकरणात सद्हेतूने कारवाई केली गेली, तर अशा परिस्थितीत कारवाई करणाऱ्या पोलिसांवर खटला भरता किंवा दावा दाखल करता येणार नाही.

## कायद्यांतर्गत शिक्षेची तरतूद

- डॉक्टर्स/रुग्णालयाच्या मालकांसाठी
- प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांसाठी कारावास आणि १० हजार रूपयांपर्यंत दंड.
- दुसऱ्यावेळी केलेल्या गुन्ह्यासाठी पाच वर्षांपर्यंत कारावास आणि

५० हजार रूपयांपर्यंत दंड.

- आरोप निश्चित झाल्यानंतर डॉक्टरांच्या वैद्यकीय परवान्याचे निलंबन.
- प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी राज्य वैद्यकीय परिषदेद्वारा पाच वर्षांसाठी वैद्यकीय परवाना रद्द करणे.
- त्यानंतर केलेल्या गुन्ह्यासाठी वैद्यकीय परवाना कायमचा रद्द करणे.
- गर्भवती महिलेचा पती/कुटुंबातील इतर सदस्य किंवा इतर व्यक्तींद्वारा लिंग चाचणी करण्यासाठी प्रेरित केल्यास -
- प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत कारावास आणि ५० हजार रूपयांपर्यंत दंड.
- त्यानंतर केलेल्या गुन्ह्याला पाच वर्षांपर्यंतचा कारावास आणि एक लाख रूपयांपर्यंतचा दंड.
- जोपर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत गर्भवती महिला ही निर्दोष असल्याचे मानले जाईल.

## कायद्याच्या अंमलबजावणीची पद्धत

- विविध स्तरांवर समुचित प्राधिका-यांची नियुक्ती करणे.
- राज्यस्तरीय पर्यवेक्षकीय मंडळाची स्थापना.
- राज्य सल्लागार समितीची स्थापना.
- तपासणी व सनियंत्रण समितीची स्थापना.
- विशेष कक्षाची स्थापना.
- जिल्हास्तरावर दक्षता पथकाची स्थापना.
- समुचित प्राधिकाऱ्यांद्वारे सोनाग्राफी केंद्रांची नियमित तपासणी
- बनावट (Decoy) केसेस शोधणे
- कायद्यातील तरतुदींचा भंग केल्याचे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही.
- राज्यस्तरीय पथकामार्फत अचानक भेटी.
- सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्र यांची धडक तपासणी मोहीम.
- जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये जन्माचे वेळीचे लिंग गुणोत्तर प्रमाणाचा आढावा.




- आरसीएच 'पीआयपी'अंतर्गत पूरक योजना
- राज्यस्तरीय कक्षाची स्थापना
- राज्यातील समुचित प्राधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा
- स्टिंग ऑपरेशेन (बनावट केस) करण्यासाठी साह्य
- पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत कोर्ट केसेसमध्ये साक्षीसाठी जाणाऱ्या साक्षीदारांना साह्य
- सोनोग्राफी केंद्राच्या तपासणीसाठी जिल्हा स्तरावर पथकांची निर्मिती
- जिल्हास्तरावर जिल्हयातील समुचित प्राधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा
- पीसीपीएनडीटी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या केंद्राची माहिती देणाऱ्या व्यक्तीस बक्षीस योजना
- जिल्हास्तरावर पीसीपीएनडीटी कक्षाची स्थापना
- राज्य व विभागीय स्तरावर टेहळणी पथकाची स्थापना
- राज्यस्तरावर हेल्पलाइन (हेल्पलाइन क्र. १८००२३३४४७५) कक्ष कार्यान्वित
- राज्यस्तरावर www.amchimulgi.gov.in या संकेतस्थळाची निर्मिती व त्यावर आलेल्या तक्रारींचे निवारण.

# महिलांचे असभ्य प्रदर्शन (प्रतिबंधक) कायदा, १९८६

**या कायद्यान्वये महिलांचे असभ्य प्रदर्शन - जाहिरात, प्रकाशने, लिखाण, चित्रे, शिल्प किंवा अन्य कुठल्याही माध्यमातून - करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा कायदा २३ डिसेंबर १९८६ रोजी अस्तित्वात आला. या कायद्याअंतर्गत दोषी आढळल्यास दोन हजार रुपये दंड आणि/किंवा दोन वर्षांपर्यंत कारावास अशी शिक्षा होऊ शकते.**





# कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५

हा कायदा २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू झाला. हिंसामुक्त जीवन हा स्त्रीचा मानवी हक्क आहे. म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार हा नि:संशयपणे तिच्या मानवी अधिकाराचा विषय आहे; तसेच तिच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करणारा गंभीर दखलपात्र विषय आहे. या टिप्पणीस व्हिएतनाम समझोता, १९९४ आणि बीजिंग अधिघोषणाकृती समितीचे व्यासपीठ (१९९५) यांनी मान्यता दिली आहे. महिलांवरील भेदभाव संपूर्णपणे मिटविण्यासाठीच्या संयुक्त कृती समितीच्या १९८९च्या समान शिफारशींनुसार संबंधित देशांनी स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध संरक्षण पुरविण्यासाठी पावले उचलावीत आणि तसा कायदा निर्माण करावा; विशेष करून महिलांना कुटुंबात होणाऱ्या हिंसाचारापासून संरक्षण देण्यासाठी कायदा करावा. म्हणून या संदर्भात आजवर राहून गेलेल्या सर्वबाजूंनी स्त्री शोषण थांबविण्यासाठीही हा ठोस व निर्णायक कायदा अस्तित्वात आला.

## ठळक तरतुदी अशा

१) या कायद्याच्या प्रकरण २ कलम ३ नुसार कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या खूप विस्ताराने दिली गेली आहे. जसे कुठल्याही स्त्रीचा प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिवीगाळ तसेच लैंगिक शोषण, तोंडी किंवा शाब्दिक छळ, भावनात्मक छळ, मानसिक छळ, आर्थिक छळ या सर्वांचा समावेश या व्याख्येत होतो. शिवाय बेकायदेशीररीत्या हुंड्याची मागणी करून बायकोचा व तिच्या नातेवाइकांचा छळ या व अशा अनेक गोष्टींचा या



व्याख्येत समावेश होतो.

२) या कायद्याअंतर्गत जी पीडित स्त्री आहे, त्या स्त्रीची व्याख्या खूप विस्तारित स्वरूपात मांडली आहे. उदा. ४९८ अ भारतीय दंड विधान या कलमाखालील पीडित स्त्री म्हणजेच लग्न झालेली स्त्री एवढाच होतो. येथे ही लग्न झालेली स्त्री तर येतेच; शिवाय अशा सर्व स्त्रिया ज्या कौटुंबिक संबंधात राहत आहेत किंवा कुणावर अवलंबून राहत आहेत. याशिवाय पीडितांमध्ये कुठलाही मनुष्य, स्त्री असो वा पुरुष, लहान मुले, आई-वडील, नोकर मंडळी किंवा कौटुंबिक संबंधात राहणारे कुणीही या कायद्याचा आश्रय घेऊ शकतात.

३) कोणतीही पीडित स्त्री किंवा बायको, जी प्रतिवादीसोबत विवाहासारख्या संबंधातून बांधली गेली आहे, ती आपल्या नवरा किंवा त्याच्या नातेवाइकांविरुद्ध तक्रार दाखल करू शकते. यासाठी तिला राज्य सरकार नियुक्त संरक्षण अधिकारी, पोलिस अधिकारी, सेवा देणारी पंजीकृत संस्था यांची मदत होईल. तशा प्रकारची तरतूद या कायद्याअंतर्गत झाली आहे. पोलीस अधिकारी, संरक्षण अधिकारी, सेवा देणारे संस्था यांचे कार्य आणि कर्तव्य सविस्तरपणे या कायद्यामध्ये दिले आहे. तसेच संरक्षण अधिकारी शक्यतो स्त्री असावी, अशीसुद्धा तरतूद आहे.

४) सेवाभावी संस्था (एनजीओ) यांची नेमणूक या कायद्याअंतर्गत अत्याचारित स्त्रीच्या मदतीसाठी करण्यात आली आहे. अशा प्रकारे पीडित स्त्रियांसाठी झटणाऱ्या सेवाभावी संस्थांना कायदेशीर हस्तक्षेपाला शिक्कामोर्तब झाला आहे. जी भूमिका ते आजवर पडद्याआडून करायचे ती यापुढे समोर येऊन करणार. या कायद्याच्या कलमानुसार ज्या व्यक्तीस कौटुंबिक हिंसाचार घडण्याची किंवा घडण्याच्या शक्यतेची माहिती द्यावयाची असेल तर तो ती माहिती संबंधित संरक्षण अधिकारी किंवा यासंबंधी सेवा देणारी संस्था यांच्याकडे देऊ शकतो.

५) अत्याचारग्रस्त स्त्रीला लवकरात लवकर न्याय मिळावा या हेतूने तशा प्रकारची विशेष तरतूद या कायद्याअंतर्गत कलम १२(५) नुसार करण्यात आली आहे.

६) या कायद्याच्या प्रकरण चारमधे पीडित स्त्रीला साह्याचे आदेश मिळविण्यासाठीची कार्यप्रणाली दिली गेली आहे. कलम १२ नुसार पीडित व्यक्ती किंवा तिच्या वतीने संरक्षण अधिकारी याने न्यायदंडाधिकारी यांच्याकडे विविध साहाय्य मिळविण्यासाठीचा आदेश काढण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज करावा.

७) पीडित स्त्रीला तिच्या हक्क बजावणीसाठी वेगवेगळया कायद्याअंतर्गत निरनिराळे दावे करण्याची आता गरज राहणार नाही. एकापेक्षा जास्त साह्याचे आदेश ती या एकमेव कायद्याखाली मागू शकते. या कायद्यामुसार न्यायाधीशांना पीडित स्त्रीच्या बाजूने संरक्षण आदेश काढण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या आदेशान्वये प्रतिवादीला कौटुंबिक हिंसाचारापासून प्रतिबंधित केले जाते.

**संरक्षण आदेशाप्रमाणेच :** अ) निवासी आदेश, आ) आर्थिक साह्यासंबंधी आदेश, इ) भरपाईचे आदेश, ई) ताबा देण्यासंबंधीचे आदेश, उ) अंतरिम किंवा एकतर्फी आदेश देण्याचा अधिकार इ. तरतुदी पीडित स्त्रीच्या हक्क बजावणी व संरक्षणासाठी केल्या गेल्या आहेत.

८) प्रतिवादीकडून संरक्षण आदेश किंवा वर निर्देशित कोणताही आदेश किंवा न्यायालयाने संमत केलेल्या अंतरिम आदेशाचे उल्लंघन झाल्यास अशा व्यक्तीस एक वर्ष कैद किंवा वीस हजार रुपये दंड किंवा दोन्ही अशा स्वरूपात शिक्षा सुनावण्यात येऊ शकते.

असे आढळून आले, की प्रतिवादी हा भारतीय दंड विधान कलम ४९८ अ किंवा हुंडा-प्रतिबंधक कायद्यानुसार आरोपास पात्र आहे, तर तसे आरोप करण्यासंबंधीची तरतूद असेल. शिवाय न्यायाधीशांना सुधारित आदेश काढण्यासंबंधीचीसुद्धा तरतूद आहे. या कायद्याखालील गुन्हा हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा समजण्यात येतो.

९) फक्त पीडित व्यक्तीच्या जबानीच्या आधारावरच गुन्हा नोंदविला जाऊ शकतो व न्यायालय गुन्हा घडल्याचा निष्कर्ष काढून शिक्षा ठोठावू शकते.



# बालविवाहांचा विळखा कायम





**आजही बालविवाहाचे प्रमाण भारतात ४७ टक्के, तर महाराष्ट्रात ३५ टक्के इतके आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्युलेशन सायन्सेस'च्या सहकार्याने केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण २०१५-१६ या चौथ्या अहवालात ही वस्तुस्थिती अधोरेखित झाली आहे.**

**प्राची एक्के**
Prachi.ekke@gmail.com

गेल्या हजारो वर्षांपासून भारतात बालविवाहाची चाल केवळ स्थिरच झाली असे नव्हे, तर पक्की होत गेली. विवाहाचे वय अधिकाधिक कमी होत गेले. पाळण्यातील मुलामुलींचे विवाह लावण्यापर्यंतही मजल गेली; इतकेच नव्हे तर दोन गरोदर स्त्रियांपैकी एकीला मुलगा व दुसरीला मुलगी होईल, असे गृहीत धरून लग्न ठरवले जाई. याला 'पोटाला कुंकू लावणे, असे म्हणतात. एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणेच्या चळवळी सुरू झाल्या. त्यावेळी त्यात बालविवाहाचा प्रश्न अतिशय तीव्रपणे चर्चिला गेला. राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन या बंगाली व ज्योतिराव फुले, म. गो. रानडे, गो. ग. आगरकर, धों. के. कर्वे या मराठी समाजसुधारकांनी बालविवाहाच्या विरुद्ध मोहीमच उघडली. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. बेहरामजी मलबारी, लाला गिरिधारीलाल, रायबहादूर बक्षी, सोहनलाल, हरी सिंग गौर, हरविलास सारडा यांनी कायदा करून सुधारणा करावी, या मताचा पुरस्कार केला व त्यांपैकी काहींनी कायदेमंडळात बालविवाहबंदीची विधेयकेदेखील आणली. त्यानंतर बालविवाहाची स्थिती सुधारण्यासाठी हळूहळू काही कायदे करण्यात आले. १८६० साली इंडियन पीनल कोड, कलम ३७५ व ३७६ अंतर्गत दहा वर्षाखालील मुलीशी वा पत्नीशीही समागम करण्यास बंदी करण्यात आली. बालविवाह प्रतिबंधक कायदा १९२९ मध्ये झाला. त्यापूर्वी बालविवाहाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने उचललेले पहिले पाऊल म्हणून कलम ३७५ मधील ही तरतूद लक्षणीय मानावी लागेल. १८९४ साली म्हैसूर सरकारने बालविवाहाचा कायदा करून, आठ वर्षांखाली मुलीचे वय असल्यास विवाहाला बंदी केली. १९०४ मध्ये बडोदा सरकारने मुलीचे विवाहयोग्य वय बारा व मुलाचे सोळा वर्षांचे ठरवले. १९२७ मध्ये इंदूर सरकारने विवाहासाठी मुलींची वयोमर्यादा बारा व मुलाची चौदा ठरविली. १९२९ साली बालविवाह प्रतिबंधक कायदा (सारडा कायदा) – या अन्वये मुलीचे वय चौदा व मुलाचे वय अठरा ठरवण्यात आले. १९५५ साली हिंदू विवाह कायदा-मुलीचे वय पंधरा वर्षांचे ठरले व मुलाचे अठरा. तसेच १९७८ च्या कायद्यानुसार मुलीचे वय अठरा व मुलाचे एकवीस वर्षे ठरले. त्यात पुढे सुधारणा होऊन देशात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ करण्यात आला व १ नोव्हेंबर २००७ पासून तो अमलात आला. बालविवाह हा कायद्याने गुन्हा ठरतो. बालविवाहासंबंधी वरील स्वरूपाचे कायदे करण्यात आलेले असले, तरी समाजावर या कायद्यांनी तसा फारसा प्रभाव पडला नाही. बालविवाह बंद करण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागले. बालविवाहाची अनिष्टता समजावून देण्यासाठी सुधारकांनी लेख लिहिले; व्याख्याने दिली; वादविवाद केले. औद्योगीकरण जसजसे वाढत गेले व शहरांची जसजसी वाढ होत गेली, तसतशी बालविवाहांना साह्यभूत होणारी एकत्र कुटुंबपद्धती हळूहळू नष्ट होऊ लागली. बालविवाहात स्त्रियांवर अकाली मातृत्व लादले जाण्याचा दोष होता. ज्या वयात शिक्षण घ्यावयाचे, त्याच वयात स्त्री-पुरुष संसारात पडत. यामुळे समाजातून विद्या नाहीशी होऊ लागली. पुढे स्त्रीशिक्षणाचा प्रसार जसजसा होत आहे, तसतसे बालविवाहाची चाल हळूहळू कमी होत गेली. तरीही ग्रामीण भागात आजही बालविवाह होतच आहेत.

आजही बालविवाहाचे प्रमाण भारतात ४७ टक्के, तर महाराष्ट्रात ३५ टक्के इतके आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने 'इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्युलेशन सायन्सेस'च्या सहकार्याने केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण २०१५-१६ या चौथ्या अहवालात ही वस्तुस्थिती अधोरेखित झाली असून, महिला आणि लहान मुलांच्या आरोग्यस्थितीत गेल्या दशकभरात फारसा फरक पडला नसल्याचेच चित्र त्यानिमित्ताने समोर आले आहे.



राज्यातील १८ ते २५ वयोगटातील मुलींपैकी २५ टक्के मुलींचा विवाह वयाची १८ वर्षे पूर्ण होण्याच्या आधीच झाल्याचे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. युनिसेफ आणि रंगनाथ मिश्रा आयोगाच्या अहवालातही १८ वर्षांच्या आतील मुलींचे लग्न होण्याचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढत असल्याचे नमूद आहे.

* युनिसेफचा महाराष्ट्र टाइम्समध्ये आलेला रिपोर्ट टाकणे.

वधू-वर सज्ञान म्हणजेच मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे असेल, तर विवाह ग्राह्य मानला जातो. याचाच अर्थ वयात येणे म्हणजे मुलगी गर्भधारणेस योग्य व मुलगा प्रजोत्पादनक्षम असून, ते शारीरिक व मानसिक परिपक्वता प्राप्त होतात, असा आहे. बालविवाह झाल्यास मुलींचा लैंगिक विकास पुरेसा झालेला नसतो, परिणामी त्यांना गर्भधारणा झाली, तर बाळाच्या पोषणासाठी शरीर सक्षम नसते. त्याचे परिणाम तिच्या आणि विशेषत: बाळाच्या आरोग्यावर होते. बालविवाहाला प्रतिबंध करण्यासाठी ‘बालविवाह प्रतिबंध अधिकारी यांची नेमणूक शासन करते. त्याचप्रमाणे प्रत्येक विभागातील समाजसेवी संस्था, ग्रामपंचायती, सरकारी कार्यालये, निमशासकीय संस्था, इत्यादींना बालविवाह प्रतिबंध करण्याचे अधिकार आहेत. या कायद्याचे पालन न करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध पुरावे गोळा करून पोलिसांच्या मदतीने योग्य ती कारवाई करता येते. बालविवाहाचे अनेक दुष्परिणाम असल्याने समाजात होणाऱ्या घातक परिणामांबद्दल जाणीव आणि जनजागृती निर्माण करणे हा या कायद्याचा उद्देश आहे. जाणीवपूर्वक बालविवाह ठरविणाऱ्यास, त्यासाठीचा सोहळा पार पाडण्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षे सक्तमजुरी, एक लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. हा विवाह रोखण्यासाठी भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाअंतर्गत चाइल्ड लाइन ही एक सेवाभावी संस्था कार्यरत आहे. अनाथ मुले, भिक्षेकरी, पीडित, अन्यायग्रस्त, हरवलेली, सापडलेली, बालकामगार मुले-मुली बालविवाहास बळी पडतात. ही संस्था संकटग्रस्त मुलांना वेळोवेळी मार्गदर्शन, समुपदेशन करते. १८ वर्षे वयापेक्षा जास्त वयाच्या पुरुषाने बालवधूशी विवाह केल्यास तो गुन्हेगार ठरून तो शिक्षेस पात्र ठरतो. या कायद्याअंतर्गत असलेले गुन्हे दखलपात्र व अजामिनपात्र आहेत.

जरठकुमारी विवाह, बालविधवांची समस्या, अकाली वैधव्य प्राप्त झालेल्या काही स्त्रियांचे अनाचार व त्यातून जन्माला येणाऱ्या अनौरस संततीचा प्रश्न, भ्रूणहत्या इ. अनेक विषय बालविवाहाशीच निगडीत आहेत. आयुर्मान घटण्यास बालविवाह आणि अकाली मातृत्व हीदेखील कारणे होती. स्त्री प्रश्नविषयी जनजागृती करताना, बालविवाहाची चर्चा होत नाही. वास्तविक बालविवाह हा केवळ सामाजिक प्रश्न नाही, तर तो लोकसंख्या नियंत्रणाशी, शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाशी व आरोग्याच्या प्रश्नाशीही जोडलेला आहे. समज येण्यापूर्वीच लग्न होत असल्यामुळे, आई-वडील शोधून देतील तशा वराबरोबर अथवा वधूबरोबर जीवन कंठणे भाग पडे. त्यातून कौटुंबिक ताण निर्माण होत, संघर्ष होत आणि पहिली पत्नी सोडून देऊन दुसरी केल्यामुळे पहिलीला परित्यक्तेचे जीवन जगावे लागे. असे अनेक एकमेकांशी निगडित असलेले प्रश्न निर्माण होत गेले. तसेच लोकसंख्यावाढीशी थेट संबंध असणाऱ्या बालविवाहांमुळे मातामृत्यू, गर्भपात, कुपोषित अर्भके (राष्ट्रीय प्रमाण ४२ टक्के), याचबरोबर स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसक्षमीकरणासंदर्भातील महत्त्वाचे प्रश्न निर्माण होत आहेत. महिला अत्याचाराला बळी पडणाऱ्यांमध्ये बालविवाह झालेल्या मुलींचे प्रमाण खूप मोठे आहे. बालविवाह व शिक्षणाचा अन्योन्यसंबंध आहे. असे स्पष्टपणे आढळते की, मुलीच्या शिक्षणातील गळतीचा परिणाम हा अपरिहार्यपणे थेट बालविवाहात होताना दिसतो. १५ ते १९ वयातील बालविवाह झालेल्या ५९ टक्के विवाहित महिला निरक्षर आढळल्या. म्हणूनच शिक्षण आणि आरोग्याचे उद्दिष्ट जर १०० टक्के साध्य करायचे असेल तर बालविवाहाचे प्रमाण शून्य टक्के केल्याशिवाय गत्यंतरच नाही इतका त्यांचा अन्योन्यसंबंध आहे.

जगात तीनपैकी एका मुलीचे लग्न वयाच्या १८ वर्षांपूर्वी होते, तर

नऊपैकी एका मुलीचे लग्न वयाच्या १५ व्या वर्षांच्या आत होते. जगातील एकूण बालविवाहांपैकी ४० टक्के बालविवाह भारतात होतात. त्याचबरोबर अफ्रिका, अफगाणिस्तान, मोझंबिका, बांगलादेश, नेपाळ यांसारख्या देशांत बालविवाह जास्त होतात. भारतातील एकूण विवाहांपैकी ४७ टक्के बालविवाह असतात. त्यात वधूचे वय हे सरासरी १२ ते १७ आढळते. अनेक भटक्या व आदिवासी जमातींत मासिक पाळी येणे हेच बालविवाहाचे वय मानले जाते. त्याला 'शहाणी झाली'असे म्हटले जाते व लगेच तिचे लग्न लावले जाते. कायदा कितीही कडक असला तरीही आजही अक्षय्यतृतीयेला राजस्थानात, मध्य प्रदेशात हजारो बालविवाह लागतात. या बालविवाहांच्या इतर परिणामांबरोबर महत्त्वाचा परिणाम हा लोकसंख्यावाढीचा असतो. शिवाय जास्त बालविवाह हे मागास, निरक्षर, अल्पशिक्षित जाती-जमातींत होतात. भारतात अभ्यासकांनी वेगवेगळ्या जनगणनेचा स्वतंत्र अभ्यास केला तेव्हा १५ ते १९ वर्षांच्या मातांच्या संख्येची टक्केवारी लक्षणीय म्हणजे १० टक्क्यांपेक्षा जास्त आढळली. इतकेच नव्हे तर वेश्याव्यवसायात विकल्या गेलेल्या मुलींच्या अभ्यासात पश्चिम बंगालमध्ये लहान मुलींना लग्नाचे आमिष दाखवून लग्न करायचे व त्यांची विक्री करायची, असेही आढळले आहे. भारतात बालविवाहांचे प्रमाण मोठे आहे. गेल्या १५ वर्षांमध्ये बालविवाहामध्ये जेमतेम ११ टक्के घट झाली असल्याची आकडेवारी चाइल्ड राईट ॲण्ड यू (क्राय) या सामाजिक संघटनेच्या पाहणीतून उपलब्ध झाली आहे. 'क्राय' या सामाजिक संस्थेने भारतातील १५ ते १८ वयोगटातील मुलांबाबत गेल्या वर्षी प्रसिद्ध केलेल्या एका अहवालातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अहवालामध्ये देशातील या वयोगटातील मुलांच्या स्थितीवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. 'क्राय'च्या या अहवालानुसार भारतातील १५ ते १९ वयोगटातील ९.२ दशलक्ष मुलांचे विवाह झाले आहेत. तर याच वयोगटातील २.५ दशलक्ष मुली माता झाल्या आहेत. बालविवाहाला आळा घालण्यासाठी अनेक दशकांपासून प्रयत्न सुरू असले, तरी हे विवाह घटण्याचा वेग खूपच कमी असल्याचेच यावरून स्पष्ट झाले आहे. तर दुसरीकडे, सामाजिक व आर्थिक समस्या, देहविक्रय आदींच्या माध्यमातून मुलींवर अल्पवयातच मातृत्व लादले जात असल्याने ती चिंताजनक बाब आहे. आपल्या देशात जगातील बालवधूंच्या तुलनेत सर्वाधिक बालवधू आहेत. त्यापैकी ५० टक्के राजस्थान, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश व पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये असल्याचे 'क्राय'च्या अहवालात म्हटले आहे. २०१५-१६च्या नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो आणि २०१६चा राष्ट्रीय कुटुंब आरोग्य अहवातील आकडेवारीच्या आधारे हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

जागतिक अभ्यासात एड्सचा प्रसार, गुप्तरोगांची लागण याचाही संबंध बालविवाहांच्या परिणामांशी जोडलेला आढळला आहे. बालवधूचा विवाह अनेकदा प्रौढांशी लावला जात असल्याने एड्सची शक्यता १५ ते १९ वयोगटातील बालवधूंत २ ते ६ पटीने जास्त असते. बालविवाहामुळे मुलींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासच खुंटतो आणि शिक्षण, करिअर त्या काहीच करू शकत नाहीत. परंतु हा इतका कळीचा मुद्दा असूनसुद्धा बालविवाह हा विषय जणू मागच्या शतकात होता आणि जणू आता ती समस्या उरलेलीच नाही, अशीच अनेकांची समजूत असते. त्यामुळे या विषयावर उपाययोजना तर सोडाच, पण फारशी चर्चाही होत नाही. पण भारतात आजही ४७ टक्के, तर महाराष्ट्रात हे प्रमाण ३५ टक्के इतके आहे हे लक्षात घेतल्यावर धक्का बसतो.

बालविवाहाचा कायदा इतका कडक असूनही त्याची अंमलबजावणी फारशी गंभीरपणे झाली नाही. या कायद्यातील इतक्या गंभीर तरतुदी करूनही दुर्दैवाने या कायद्याचा वापर खूपच कमी झाला आहे. संपूर्ण देशात २०११ साली फक्त ११३ गुन्हे दाखल झालेत. शिक्षा होणे हे दूरच. त्यातही महाराष्ट्रात फक्त १९ गुन्हे आहेत. देशातील १८ राज्यांत तर एकही गुन्हा दाखल झाला नाही. ज्या देशात ४७ टक्के विवाह आजही बालविवाह आहेत अशा देशात दरवर्षी केवळ ११३ गुन्हे दाखल व्हावेत हे दुर्दैवी आहे.

बारामती तालुक्यातील अनिल दत्तात्रय चाचर हे प्राथमिक शिक्षक असून आशा प्रकल्पांतर्गत पुरंदर, बारामती, फलटण आणि खंडाळा या चार तालुक्यातील स्थलांतरित कुटुंबांच्या मुलांना शिक्षण देण्याचे काम ते करत आहेत. तसेच भारत ज्ञान विज्ञान समुदाय या संस्थेमार्फत त्यांच्या कार्यकर्त्यांसह बालविवाह रोखण्याचे काम गेली अनेक वर्ष करत आहेत. त्यांच्याशी बोलून माहिती घेतली असता ते म्हणाले, बारामती, पुरंदर या तालुक्यात आजही मोठ्या प्रमाणावर बालविवाह होताना दिसतात. आम्ही हे चित्र पाहतोय. जेव्हा जेव्हा शक्य असतं त्यावेळी आम्ही पोलीसांच्या मदतीने आणि समुपदेशन करून हे थांबवण्याचा प्रयत्न करतो, परंतु तरीही असे विवाह होताना दिसतात. जेजुरी भागात एकत्रितरित्या होत असलेले ७ बालविवाह आम्ही पोलिसांच्या मदतीने रोखले. जेजुरीचे एपीआय अंकुश माने यांनी काही महिन्यांपूर्वी स्वतः एक बालविवाह रोखला. पोलिसांची चांगली मदत आम्हाला याकामी सतत होत असते. आम्ही या लोकांच्या पालावर जाऊन त्यांना समजवायचा पूर्ण प्रयत्न करतो. आमचं समुपदेशन सतत सुरूच असतं. अनेक जण त्यांच्या समाजातील रूढी, परंपरेमुळे यात ओढले जातात असं प्रकर्षानं जाणवतं. तसंच अज्ञान, अंधश्रद्धा यामुळेही ते बालविवाह करतात. आपला मुलगा किंवा मुलगी पळून जाऊन लग्न करू नये किंवा हलक्या जातीतल्या मुलाशी, मुलीशी लग्न करू नये यासाठीही ते बालविवाहाला महत्व देतात. या मुलांचं चौथी पर्यंतच शिक्षण होतं बऱ्यापैकी. पाचवीपासून पुढे त्यांना शिकवायची पालकांची इच्छा नसते. तसंच माध्यमिक शाळेत गेल्यावर तिथले शिक्षकही या मुलांकडे दुर्लक्ष करतात असाही अनुभव येतो. चौथी पर्यंत आम्ही त्यांच्या पालावर जाऊन त्यांना शाळेत घेऊन येतो आणि परत घरी सोडतो. हि मुलं इंग्रजीही चांगलं शिकतात मात्र माध्यमिकला गेल्यावर त्यांच्याकडे दुर्लक्ष होतं तसंच मग मुलांच्या शिक्षणावर खर्च करण्याची त्यांच्या पालकांची तयारीही नसते आणि त्यांना ते परवडणारही नसतं त्यामुळे मुलांना कामाला लावणे किंवा त्यांचं लग्न करणे यावर पालकांकडून भर दिला जातो. म्हणजे बालमजूर किंवा बालविवाह यासाठी ते आग्रही असतात. त्यांची परिस्थितीही यासाठी मोठ्या प्रमाणात कारणीभूत असते. ज्या मुलांना चौथी पर्यंत शिकवलं त्या मुलांची लग्न होतात त्यांना आता अपत्यही आहेत हे डोळ्यादेखत दिसत असतं मात्र काही करता येत नाही. कारण कित्येकदा हि लग्न छुप्या पद्धतीने होतात. याचा गाजावाजा केला जात नाही. एकाच घरात राहून, एकाच पालावर राहून त्या मुलामुलींना तिथेच पण थोडं वेगळं ठेवलं जातं आणि त्यांचे इतर कुटुंबीय वेगळे राहतात. कितीही प्रयत्न केला तरी याचं समूळ उच्चाटन करता येत नाही. मात्र काही प्रमाणात आम्हाला यश येत आहे असं म्हणायला हरकत नाही. सोमेश्वर कारखान्यावर ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आम्ही प्रोजेक्ट राबवतो. पारधी कुटुंबातील एका मुलीचा बालविवाह थांबवून तिच्या पालकांना समजावून तिच्या शिक्षणासाठी आम्ही प्रयत्न केले. आज ती मुलगी नववीत शिकत आहे तसंच एका मुलीने अकरावीत पळून जाऊन लग्न केलं ती बालविवाहालाच बळी पडली होती तिला परत आणून शिक्षणासाठी प्रवृत्त केलं. ती आज तिच्या नवऱ्याकडेच राहतेय पण तिने नुकतीच बारावीची परीक्षा पास केली अशी उदाहरणंही पाहायला मिळतात.

# अर्थगणेश





**गणपतीच्या प्रत्येक अवयवाचं एक विशिष्ट महत्त्व आहे, त्यामध्ये एक निराळाच अर्थ दडलेला आहे. त्याच्या विविध अवयवांतून आपल्याला गुंतवणुकीच्या विविध प्रकारांचा बोध होऊ शकतो.**

**शैलेश गद्रे,**
support@gkfinsol.com, ९९३०८४७३३४

श्रावण महिना संपता संपताच सर्वांना गणेश चतुर्थीचे वेध लागतात. गणपती हे तर महाराष्ट्राचं आराध्य दैवत. गणेश चतुर्थीला स्थापन होणाऱ्या गणपतीबाप्पांचं अनंत चतुर्दशीपर्यंत मोठ्या प्रेमानं आणि भक्तिभावानं पूजन केलं जातं. गणपती ही साक्षात बुद्धीची देवता. चौदा विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असणाऱ्या श्री गणेशाची विविध रूपं आपल्याला नेहमीच मोहवतात. रूढार्थानं इतर देवीदेवतांपेक्षा निराळंच असं या गणपतीबाप्पाचं बाह्य स्वरूप आहे. तो एकदंत, वक्रतुंड, लंबोदर, गजकर्ण आहे. आजवर अनेकांनी अनेक प्रकारे गणपतीचं, त्याच्या विविध रूपांचं अतिशय सुंदर वर्णन केलेलं आहे.

गणपतीच्या प्रत्येक अवयवाचं एक विशिष्ट महत्त्व आहे, त्यामध्ये एक निराळाच अर्थ दडलेला आहे. गणपतीचं संपूर्ण रूप, त्याचे सर्वांहून निराळे अवयव काही विशिष्ट गोष्टी सूचित करतात. त्याच्या रूपामध्ये, त्याच्या अवयवांमध्ये काही विशिष्ट असा गर्भितार्थ दडलेला आहे. आम्ही जेव्हा गणपतीच्या अवयवांबद्दल अभ्यास केला तेव्हा रिद्धी सिद्धी ज्याच्या पत्नी आहेत अशा या अर्थगणेशामध्ये आणि आर्थिक गुंतवणुकीमध्ये आम्हाला काही आश्चर्यकारक साधर्म्य आढळलं. या लेखाद्वारे हे साधर्म्य आम्ही आपल्यासमोर मांडत आहे.

**मस्तक :**

मस्तक हा शरीराचा केंद्रबिंदू. माणसाच्या प्रत्येक विचारांचा आणि कृतीचाही उगम हा त्याच्या मस्तकामध्ये होत असतो. गणपतीचे मस्तक खूप मोठे आहे. नेहमी मोठा, दूरदृष्टीने आणि सारासार विचार करावा असेच ते आपल्याला सूचित करते. मनामध्ये निर्माण होणाऱ्या छोट्या छोट्या विचारांचा समुच्चय एकत्र येऊनच आपल्याकडून मोठी कृती घडते.

गुंतवणुकीबाबतही समान तत्त्व लागू पडतं. भविष्यातील मोठ्या आर्थिक उद्दिष्टांचा दूरदृष्टीने विचार करून जर आपण आतापासूनच सिस्टीमटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एस. आय. पी.) पद्धतीने थोडी थोडी गुंतवणूक करायला सुरूवात केली तर दीर्घकालामध्ये (साधारण १० ते १२ वर्षे कालावधीसाठी केलेल्या गुंतवणुकीला दीर्घकालीन गुंतवणूक असं म्हणतात.) आपण निश्चितपणे मोठी संपत्ती निर्मिती करू शकतो. कारण एस.आय. पी. पद्धतीनं केलेल्या गुंतवणुकीमध्ये आपल्याला चक्रवाढ (पॉवर ऑफ कंपाउंडिंगचा) फायदा मिळतो. 'थेंबे थेंबे तळे साचे' ही उक्ती एस.आय.पी. गुंतवणूकीच्या बाबतीत सर्वार्थानं खरी ठरते.

**सोंड :** गणपतीची लांब सोंड हे स्वीकारार्हतेचं प्रतीक आहे. श्री गणेश जीवनातील चढ-उतारांचा, सकारात्मक, नकारात्मक परिस्थितींचा आणि वाटेत येणाऱ्या संकटांचा सहज स्वीकार करून आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यामधून सुयोग्य मार्ग काढतो. बऱ्याच वेळा गणपतीने आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि चातुर्याच्या जोरावर अनेक संकटांचा लीलया सामना केल्याचं आणि त्यामधून मार्ग काढल्याचं आपल्याला पौराणिक कथांमध्ये वाचायला मिळतं.



शेअर मार्केट हे स्थिर कधीच नसतं. ते वर खाली होतच असतं. मार्केटमध्ये चढ-उतार हे होतच राहणार, परंतु त्याचा सहज स्वीकार करून आपण गुंतवणूकीचा सुयोग्य आणि स्मार्ट पर्याय निवडला तर दीर्घाकालीन गुंतवणूकीमधून आपण आपली सर्व आर्थिक ध्येयं साध्य करू शकतो आणि भविष्यासाठी उत्तम तऱ्हेनं संपत्तीनिर्मितीही करू शकतो.

**बारीक डोळे :** श्री गणेशाचे बारीक डोळे हे सूक्ष्म अवलोकनाचं प्रतीक आहेत. आपल्या सूक्ष्म नजरेच्या आणि तीक्ष्ण निरीक्षणशक्तीच्या जोरावर गणपती अनेक कार्यं, अनेक उद्दिष्टं लीलया साध्य करतो.

आपल्या आर्थिक उद्दिष्टांचं सूक्ष्म अवलोकन करा. आर्थिक उद्दिष्टांच्या अपेक्षित कालावधीनुसार त्यांची वर्गवारी करून सुयोग्य गुंतवणूक सल्लागाराच्या मार्गदर्शनाखाली आपली आर्थिक योजना तयार करा. एस.आय.पी पद्धतीने केलेली गुंतवणूक आपली विविध कालावधींची (लॉँगटर्म, शॉर्ट टर्म, मिडटर्म) आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यास सहाय्यभूत ठरते.

**एकदंत :** गणेशाचा एकदंत हे चांगल्या वाईटाची निवड करताना बाळगायच्या सावधगिरीचं, जागरूकतेचं प्रतीक आहे. कोणत्याही गोष्टीचा सखोल अभ्यास आणि अवलोकन करूनच आपल्याला चांगलं वाईट ठरवायचं असतं. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर जागरूक राहूनच कोणतेही निर्णय घ्यायचे असतात.

आर्थिक गुंतवणूक करताना तर विशेष सावधगिरी बाळगायला हवी. सदैव जागरूक रहायला हवं. अधिक लाभाच्या मोहापायी किंवा कोणाच्यातरी दबावाला बळी पडून काही वेळा चुकीच्या गुंतवणूक पर्यायाची निवड केली जाऊ शकते आणि नंतर आपण कष्टानं कमावलेले पैसे गमावल्यावर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. त्यामुळं नेहमीच गुंतवणुकीच्या विविध पर्यायांचा सखोल अभ्यास करून, तज्ञ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली जागरूक राहून आपल्यासाठी सुयोग्य गुंतवणूक पर्यायाची निवड करावी. तज्ञ आणि अनुभवी मार्गदर्शकाच्या सल्ल्यानुसार केलेली आर्थिक गुंतवणूक लाभदायक ठरते.

**मोठे कान :** गणेशाचे मोठे कान हे उत्तम श्रोता असण्याचं, बहुश्रुत असण्याचं प्रतीक आहेत. असं म्हणतात की, आपल्या मोठ्या कानांद्वारा तो जगातील उत्तमोत्तम ज्ञान ग्रहण करतो, सूक्ष्मपणे त्याचं अवलोकन आणि आकलन करतो आणि आपल्या विशाल मस्तकामध्ये हे ज्ञान धारण करून जगाच्या कल्याणासाठी त्याचा अवलंब करतो.

गुंतवणूकदारांनाही उत्तम श्रोता होण्याची आवश्यकता आहे. आपले कान आणि डोळे नवीन ज्ञान आत्मसात करण्यासाठी सदैव उघडे ठेवा. आपल्या गुंतवणूक मार्गदर्शकाकडून वेळोवेळी मिळणारे सुयोग्य आर्थिक सल्ले काळजीपूर्वक ऐका, सूक्ष्मपणे त्याचं अवलोकन करा आणि प्रत्यक्ष गुंतवणूक करताना या सल्ल्यांचा अवलंब करा. गुंतवणूक सल्लागारानी आपल्या प्रदीर्घ अनुभवातून आणि सूक्ष्म अभ्यासामधून दिलेले आर्थिक सल्ले हे निश्चितपणे गुंतवणूकीचा सुयोग्य पर्याय निवडण्यासाठी उपयुक्त ठरतात.

**मोदक :** मोदक म्हणजे 'आनंद देणारा, लाभदायक'. असं म्हणतात की जगाच्या उद्धारासाठी असुरांशी युद्ध करून त्यांचा विनाश करणाऱ्या गणेशाला माता पार्वती त्याच्या आवडत्या मोदकांचं बक्षीस द्यायची.

नियमित आणि शिस्तबद्ध पद्धतीनं केलेले प्रयत्न आपल्या निश्चितपणे यश, आनंद मिळवून देतात याचंच हे प्रतीक नव्हे काय! नियमित आणि शिस्तबद्ध पद्धतीनं केलेली नियोजनबद्ध दीर्घकालीन गुंतवणूक आपल्याला पॉवर ऑफ कंपांउंडिंगच्या रूपात धनलाभ मिळवून देते. अशी गुंतवणूक महागाईच्या असुराचाही उत्तम रीतीने सामना करते.

**लंबोदर :** गणेशाचं विशाल उदर आपल्याला जीवनातील चढ उतारांचा स्वीकार करण्याचे, मन विशाल करून इतरांच्या चुका पोटात घालण्याचे सूचित करते.


आपण जीवनातील चढ उतारांचा सहज स्वीकार करून हार न मानता दीर्घकालीन भविष्याची सुंदर स्वप्नं रंगवत असतो. त्याचप्रमाणं आपण मार्केटमधील चढ उतारांचा सहज स्वीकार करून दीर्घकालीन गुंतवणुकीच्या उद्दिष्टांवर ठाम रहायला हवं. मार्केट पडलेल्या स्थितीत असताना आपली दीर्घकालीन गुंतवणूक न थांबवता किंवा न काढून घेता सुरू ठेवायला हवी. खरंतर पडलेली मार्केटची स्थिती ही नवीन गुंतवणूक करण्यासाठी आणि अगोदरची गुंतवणूक वाढवण्यासाठी एक सुयोग्य संधी असते. ज्याप्रमाणं सेलमध्ये आपल्याला उत्तम दर्जाच्या वस्तू कमी किंमतीत उपलब्ध होतात अगदी त्याचप्रमाणं मार्केट पडलेल्या स्थितीमध्ये आपल्याला कमी किंमतीमध्ये उत्तम म्युच्युअल फंड कंपन्यांचे युनिटस् उपलब्ध होतात. आपली आणि आपल्या कुटुंबाची भविष्यातील सुंदर स्वप्नं साकार करण्यासाठीच तर आपण गुंतवणूक करत असतो ना !

**मूषक :** मूषक हा तर गणपतीचा विश्वासू साथीदार. गणपतीच्या जीवनातील प्रत्येक चढ-उतारामध्ये त्याची साथ देणारा, गणपतीला त्याच्या उद्दीष्टांपर्यंत सुखरूप नेऊन पोहचवणारा. अगदी एस.आय.पी गुंतवणुकीसारखा! एस.आय.पी.देखील आपल्या गुंतवणुकीमधील आपला सच्चा आणि विश्वासू साथीदार आहे. गुंतवणूकीमधील चढ-उतारामध्ये एस.आय.पी. आपल्याला समर्थ साथ देते आणि आपल्याला सुखरूपपणे आपली आर्थिक उद्दिष्टं साध्य करायला मदत करते. आपल्या आर्थिक उद्दिष्टाच्या कालावधीनुसार आणि आपल्या जोखिम घेण्याच्या क्षमतेनुसार आपण निरनिराळ्या म्युच्युअल फंडांमध्ये एस.आय.पी, पद्धतीने गुंतवणूक करू शकतो. यासाठी तज्ज्ञ आणि अनुभवी म्युच्युअल फंड गुंतवणूक सल्लागार आपल्याला अधिक चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करू शकतात.

कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी तज्ञ सल्लागाराची निवड करताना काही महत्त्वपूर्ण बाबी लक्षात घ्यायला हव्यात.

१. सल्लागाराची विश्वासार्हता २. म्युच्युअल फंडाचा, बदलत्या मार्केट ट्रेंडसचा सखोल अभ्यास ३. गुंतवणूक क्षेत्रातील उत्तम अनुभव ४. तुमची स्वप्नं आणि आर्थिक उद्दीष्टं जाणून घेण्याची संवेदनशीलता ५. पारदर्शी व्यवहार.

(लेखक कायद्याचे पदवीधर असून 'गद्रेज नॉलेज अॅन्ड फायनान्शिअल सोल्युशन्स'चे (जी.के.एफ.एस. मुंबई) प्रवर्तक आहेत. लेखक गुंतवणूक आणि इन्शुरन्स या विषयामधील तज्ज्ञ असून या क्षेत्रामध्ये त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे.)



# सकारात्मकता हाच उपाय



**ताण-तणाव दूर करण्याचे काही उपाय आपण मागील लेखात पाहिले. हे उपाय सकारात्मक पद्धतीने केल्यास आणि ताण-तणावचे व्यवस्थापन अधिक चांगल्या पद्धतीने करू शकू. या लेखात आणखी काही उपायांचा वेध घेऊ या.**

**डॉ. राजेंद्र कंटक,**
१३, दौलत कॉलनी, मार्केट यार्ड, कऱ्हाड, जि. सातारा, ९८८१४४३२४३

लहानांपासून मोठ्यापर्यंत मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या ताणतणावाची कारणे आणि लक्षणेही वेगवेगळी असतात. आपण तणावात (टेन्शन) असताना दुसरे कोणी आपला तणाव दूर करू शकत नाही. त्यासाठी स्वतःचीच मदत घेऊन नकारात्मक विचारांना दूर कसे करता येईल, यासाठी आपण मागील लेखात १.) कोणतेही काम आनंदाने करणे २.) संपर्क ३.) संवाद ४.) विनोद हे उपाय पाहिले. उपाय करतानाही सकारात्मक दृष्टिकोनातून केल्यास ताण तणावाचे व्यवस्थापन आपण चांगल्या प्रकारे करू शकू. वयोमानानुसार ताणतणावाची कारणे व लक्षणे वेगळी असतात. मात्र, त्यावरील उपाय सारखे असले तरीही वय, कारण व लक्षणे यानुसार सांगितलेल्या उपायांचे प्रमाण कमी-जास्त करावे लागते.

ताण कमी करण्याचा पाचवा उपाय म्हणजे प्रत्येक बाबतीत सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे. सध्याच्या आधुनिक जगात पिढीनुसार विचारांचा दृष्टिकोनही बदलतो. तो सकारात्मकतेकडून नकारात्मकतेकडे किंवा उलटा अशा पद्धतीने पाहायला मिळतो. याचसाठी जुन्या पिढीने नव्या पिढीला समजून घेतले पाहिजे. तसेच, नव्या पिढीने जुन्या पिढीचा आदर राखला पाहिजे. उदा. नव्या पिढीला संध्याकाळी देवापुढे 'शुभं करोति' म्हण असे सांगितले की, 'माझा अभ्यास आहे,' असे उत्तर येते. या उत्तराने साहजिकच जुनी पिढी तणावाखाली येते. कारण, मन एकाग्र होण्यासाठी या गोष्टी आवश्यक असतात. चांगले सांगूनही लहानांनी आपले ऐकले नाही, या विचाराने मोठ्यांच्या मनात तणाव निर्माण होतो. नव्या पिढीला या गोष्टी माहिती नसतात. त्यांना त्या सांगणे गरजेचे असते. त्याचप्रमाणे सध्याच्या प्रगतीच्या जगात राहायचे तर अभ्यास आवश्यक आहे, हे मोठ्यांनी समजून घेतले पाहिजे. मग, 'शुभं करोति' म्हणायला सांगायचे नाही का? तसेही नाही. साधारण अभ्यासाची चौकशी करून वेळ असला की आणि सुटीच्या दिवशी मोठ्यांनी लहानांबरोबर श्लोक म्हणावेत, म्हणजे लहानांची उत्सुकता वाढेल. आपले संस्कार टिकावेत, या हेतूने जुनी पिढी नव्या पिढीवर संस्कार करीत असते. नवी पिढी मात्र पाश्चात्त्यांचे अनुकरण करताना दिसते. संस्कृती टिकवलीच पाहिजे, पण ती रुजवताना सकारात्मक पद्धतीने नवीन पिढीला सांगायचा प्रयत्न केला पाहिजे. अनेक गोष्टी केवळ दोन पिढ्यांतील विचारांच्या फरकामुळे (जनरेशन गॅप) वादास कारणीभूत ठरतात आणि परिणामी ताण-तणाव निर्माण होतो. हा विचारांतील फरक कमी करायचा तर जुन्या पिढीने नव्या चालीरीतींकडे आणि नव्या पिढीने पारंपरिक चालीरीतींकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. काही गोष्टींबाबत मात्र परिस्थिती पाहूनच निर्णय घेणे योग्य ठरते.

सध्याच्या प्रगतिशील जगात पती-पत्नी दोघेही नोकरी करतात. ते एकमेकांना वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे ताणतणाव वाढविणारे वाद होतात. त्यामुळेच सध्या घटस्फोट, अत्याचार आदींचे प्रमाण वाढल्याचे दिसते. हे दूर ठेवण्यासाठी दोघांनीही सकारात्मक विचार करून एकमेकांना वेळ दिला पाहिजे आणि परस्परांशी संवाद वाढविला पाहिजे.

आज वयस्कर व्यक्तींच्या बाबतीतही अनेक ताण-तणाव जाणवतात. एकटे राहणे किंवा वृद्धाश्रमात राहणे, तसेच शारीरिक आजार जसे, मधुमेह, सांधेदुखी, लक्षात न राहणे इ. तक्रारी वाढलेल्या असतात. 'आपल्याला कोणी विचारत नाही' अशी भावना बळावते. त्याचबरोबर झोप कमी होणे वा न लागणे, संवाद साधायला कोणीही नसणे, मनाची अस्वस्थता, आपल्या समवयस्क व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतरची अस्वस्थता, चिडचिड होणे इ. अनेक कारणे वयस्कर व्यक्तींबाबत तणाव निर्माण करीत असल्याचे दिसते.

अशी परिस्थिती असताना वाईट वाटून घेत किंवा दुःख मानत न बसता गाणी ऐका., समवयस्क व्यक्तींशी मैत्री करा. संवाद साधा, हास्य विनोद करा, समवयस्कांचा ग्रुप, कट्टे इत्यादीमध्ये सहभागी व्हा. कीर्तनाला जा. काही जण नास्तिक असतात, पण अशा ठिकाणी निरनिराळ्या व्यक्ती

भेटतात म्हणून जा. बरोबरीचे लोक भेटले की एकटेपणाची जाणीव होत नाही.

प्रत्येक वयस्कर व्यक्तीला बाहेर जाता येईल असे नाही. गुडघेदुखी, अशक्तपणा इत्यादीमुळे बाहेर जाता येत नाही. अशांनी पुस्तक वाचन, गायन, इ. मध्ये मन रमवावे. शेजाऱ्यांची वा ओळखीच्यांच्या लहान मुलांना बोलावून त्यांना गोष्टी सांगाव्यात. त्यांना नवनवीन गोष्टींची माहिती द्यावी. साहजिकच मुलांनाही गोष्टी ऐकायची सवय लागेल आणि ती मुले कायमची संपर्कात राहतात.

स्वतःच्या मुलांना समजून घ्या पण मुले स्वतःची असली तरी कडक निर्णय घ्यायला मागेपुढे पाहू नका. तसेच, मृत्यू हा अटळ आहे. त्यामुळे आहेत ते दिवस आनंदाने जगा. प्रत्येक व्यक्तीला देवाने एक वेगळा गुण दिलेला असतो. त्याचा वापर करून छंद जोपासा आणि इतरांनाही आनंद द्या.

अनेक जण मला विचारतात, की सरात्मकता वाढविण्यासाठी काय करायचे? तर, मनाची सकारात्मकता वाढवायची असल्यास मनाचा चंचलपणा कमी करून एकाग्रता वाढवली पाहिजे. त्यासाठी ध्यान धारणा, योग इ. केले पाहिजे.

## ध्यान, योग, व्यायाम

ध्यान केल्याने मनाची एकाग्रता वाढून मनात योग्य आणि चांगले विचार वाढीस लागतात. तसेच, योग, व्यायाम यामुळे स्नायूंना योग्य ताण पडतो. हालचाल चांगली होते. रक्ताभिसरण क्रिया योग्य होते व मानची एकाग्रता वाढविणारे स्राव शरीरात निर्माण होतात व ताण कमी होतो. वयोमानानुसार तसेच, शारीरिक व्याधीनुसार योग्य व्यायाम केल्यास शरीराची प्रतिकारक्षमता वाढतेच, पण मनाची ताकदही वाढलेली दिसते.

व्यायाम हा रोज किमान १५ मिनिटे तरी केलाच पाहिजे. त्यासाठी प्रथम आपण आळस झटकून टाकला पाहिजे. हल्ली व्यायाम न करण्यासाठी अनेक जण वेगवेगळी कारणे देत असतात. सर्वांत अधिक प्रमाणात दिले जाणारे कारण म्हणजे वेळ नाही. या कारणाला आळस म्हणतात. तर मित्रांनो, वेळ काढा व व्यायाम, ध्यान-धारणा, योग, प्राणायाम इ. अनेक व्यायामांपैकी तुम्हाला योग्य वाटेल, जमेल असा शारीरिक क्षमतेनुसार व्यायाम अवश्य करा. जेणेकरून, शरीराची हालचाल वाढेल आणि मनाची चंचलता कमी होईल.

# ‘पद्म’साठी प्रथमच नऊ महिला खेळाडूंची शिफारस


विनेश फोगट


हरमनप्रीत कौर


राणी रामपाल


मनिका बात्रा


ताशी मलिक


नुंगशी मलिक


सुमा शिरूर

**नवी दिल्ली :** केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने प्रथमच फक्त महिला क्रीडापटूंची यंदाच्या पद्म पुरस्कारांसाठी शिफारस केली आहे. सहा वेळा जगज्जेती ठरलेली मुष्टियोद्धा एम. सी. मेरी कोमला पद्म विभूषण व आघाडीची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूची पद्मभूषण पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे.

मेरी कोम ही क्रीडा मंत्रालयाकडून पद्म विभूषण पुरस्कारासाठी शिफारस केली गेलेली पहिलाच महिला खेळाडू ठरली. या शिवाय सात महिला क्रीडापटूंची पद्मश्री पुरस्कारांसाठी शिफारस करण्यात आली आहे. क्रीडा मंत्रालयाने त्यात नंतर तिरंदाज तरुणदीप राय व हॉकीपटू एम. पी. गणेश यांची भर घालत पद्मश्री पुरस्कारासाठी त्यांची शिफारस केली आहे.

३६ वर्षीय मेरी कोम ही पद्म विभूषण पुरस्काराने सन्मानित केली जाणारी चौथी क्रीडापटूही ठरेल. यापूर्वी, २००७ मध्ये ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंद, २००८ मध्ये महान फलंदाज सचिन तेंडुलकर, गिर्यारोहक सर एडमंड हिलरी यांना या पुरस्काराने सन्मानित केले गेले होते. याशिवाय, मेरीला २०१३ मध्ये पद्मभूषण व २००६ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरवले गेले. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत विजेतेपद मिळवणारी पी. व्ही. सिंधू हिची यंदा पद्मभूषण या देशातील तिसऱ्या क्रमांकाच्यां सर्वोच्च नागरी पुरस्कारासाठी शिफारस झाली आहे. २४ वर्षीय सिंधूला २०१५ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

पद्मश्री पुरस्कारासाठी शिफारस केल्या गेलेल्या सात महिला क्रीडापटूंमध्ये मल्ल विनेश फोगट, भारतीय महिला टी-२० क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर, भारतीय हॉकी संघाची कर्णधार राणी रामपाल, राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती टेबल टेनिसपटू मनिका बात्रा, गिर्यारोहणातील जुळ्या बहिणी ताशी व नुंगशी मलिक, माजी नेमबाज सुमा शिरूर यांचा समावेश आहे. क्रीडा मंत्रालयाने या यादीत तरुणदीप राय व हॉकीपटू एम. पी. गणेश यांचा त्यात समावेश केला आहे. या वर्षी हॉलंडमध्ये जूनमध्ये झालेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये अतानु दास व प्रवीण जाधव यांच्यासमवेत सांघिक रिकर्व्हमध्ये रौप्य मिळविले होते. एम. पी. गणेश हे १९७२ म्युनिच ऑलिम्पिकमध्ये ब्राँझ पदक जिंकलेल्या हॉकी संघाचे सदस्य होते. याशिवाय १९७१ बार्सिलोना विश्वचषकात ब्राँझ पदक जिंकणाऱ्या व १९७३ मध्ये ॲम्स्टरडॅम येथील विश्वचषक स्पर्धेत रौप्य जिंकलेल्या भारतीय संघातूनही त्यांनी भाग घेतला होता. वरील सर्व शिफारशी पद्म पुरस्कार समितीकडे पाठवल्या गेल्या असून मंजुरीनंतर पुरस्कार जेत्यांची नावे पुढील वर्षाच्या प्रारंभी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर केली जाणार आहेत.

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

## कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याबाबत (पॉश) देशातील पहिला ऑनलाइन अभ्यासक्रम

**अभ्यासक्रमातील ठळक घटक**

लैंगिक छळ म्हणजे नेमके काय?

कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाची व्याख्या

'पॉश' कायदा

'पॉश' कायद्याचा परिणाम आणि प्रतिसाद




आपण बदल कसा घडवू शकतो?

ऑनलाइन नोंदणी येथे करा : www.safindia.academy

SAF INDIA ACADEMY

PUSH
people United against Sexual Harassment



// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२-२६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com


प्रति / TO


RNI No. MAHMAR49593



If undelivered, pls return to,
महाराष्ट्र राज्य महिला
आयोग, मुंबई,
गृहनिर्माण भवन म्हाडा
बिल्डिंग, कलानगर,
वांद्रे (पू.),
मुंबई ४०००५१